पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

यवतमाळ ■ वर्ष १ ■ अंक ६२ ■ रविवार दि. २६ जुलै २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पुष्ठे ४

■ RNI No.- MAMAR/26/A4531 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com







## »थोडक्यात

### जोशींकडे शिक्षण मंत्रालयाची धुरा!

नवी दिल्ली : नीट पेपरफुटीच्या वादात केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर देशाच्या राजकारणात मोठ्या घडामोडी घडल्या आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या सूचनेनुसार राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी प्रधान यांचा राजीनामा तात्काळ मंजूर केला. यानंतर, केंद्रातील अनुभवी नेते प्रल्हाद जोशी यांच्याकडे शिक्षण खात्याची अतिरिक्त जबाबदारी देण्यात आली आहे. सध्या ग्राहक व्यवहार, अन्न-नागरी पुरवठा आणि अक्षय ऊर्जा मंत्रालयाचे कामकाज पाहणारे जोशी आता शिक्षण खात्याचीही सूत्रे हाती घेतील. प्रल्हाद जोशी यांच्या निवडणूक आयोगाला दिलेल्या प्रतिज्ञापत्रानुसार, त्यांचे सुरुवातीचे प्राथमिक शिक्षण स्थानिक रेल्वे स्कूलमध्ये झाले. त्यापुढील माध्यमिक शिक्षण त्यांनी हुबळीतील 'न्यू इंग्लिश स्कूल'मधून पूर्ण केले.

### वांगचुक यांनी विद्यार्थ्यांना दिले राजीनाम्याचे श्रेय!

नवी दिल्ली : नीट पेपरफुटी प्रकरणावरून दिल्लीत महिनाभरापासून सुरू असलेल्या आंदोलनानंतर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी अखेर राजीनामा दिला आहे. या मोठ्या घडामोडीनंतर आंदोलक विद्यार्थ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहिलेले प्रसिद्ध पर्यावरण कार्यकर्ते आणि शिक्षणतज्ज्ञ सोनम वांगचुक यांनी पहिली प्रतिक्रिया दिली आहे. 'सरकारने आणि धर्मेंद्र प्रधान यांनी घेतलेल्या निर्णयाचे मी स्वागत करतो. हा देशातील लोकशाहीचा मोठा विजय आहे,' असे सांगत त्यांनी सीजेपीच्या कार्यकर्त्यांचे, विद्यार्थ्यांचे आणि संपूर्ण देशवासीयांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

### पुढील 2 दिवस पाऊस झोडपणार!

मुंबई : बंगालच्या उपसागरावर कमी दाबाचे क्षेत्र सक्रिय झाले असून येत्या दोन दिवसात राज्यभरात पावसाचा जोर वाढणार आहे. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार, पुढील ४ दिवस कोकण किनारपट्टीसह घाटमाथ्यावर पूर्व विदर्भ व मराठवाड्यातील जिल्ह्यांसह मध्य महाराष्ट्रात मुसळधार अतिमुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. गेल्या दोन-तीन दिवसांपासून राज्यभरात हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची नोंद होत आहे.

# ही ठिणगी विझू देऊ नका- उद्धव ठाकरे

## मोदींपासून नितीन गडकरी सगळ्यांना सुनावले

प्रतिनिधी २६ जुलै

**मुंबई :** केंद्र सरकारला नमवणाऱ्या देशातील तरुणाईचं मी अभिनंदन करतो. मुंबईत जमलेली ही गर्दी कोणतीही निवडणूक झाल्यानंतरची नाही, तर अंधभक्तांविरोधात देशभक्त जिंकल्यानंतरची आहे. ही संघर्षाची सुरुवात आहे. हा संघर्ष भाजप विरुद्ध भारत असा आहे. या संघर्षात जातपात, धर्म विसरुन सहभागी व्हा. मी भारतीय आहे, ही जाणीव ठेवा, असे आवाहन शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केले. ते रविवारी मुंबईच्या शिवाजी पार्क येथे आयोजित करण्यात आलेल्या तिरंगा रॅलीच्या व्यासपीठावरुन बोलत होते. यावेळी उद्धव ठाकरे यांनी पंतप्रधान मोदी, भाजप आणि महायुती सरकारला लक्ष्य केले. एका झुरळाने हुकूमशहाला नमवले आहे. हा खरा विष्णूचा अवतार आहे. मोदीजी आतातरी देशाकडे लक्ष द्या. तुमचे मंत्री त्यांचं काम सोडून इतर पक्ष फोडण्यात बिझी आहेत. त्यांना आतातरी म्हणा देशाचं काम करा. अर्थमंत्री निर्मला सीतारामन महागाई, घसरणारा रुपया यावर एक शब्द बोलत नाहीत फक्त पेपरफुटीचे फायदे सांगत आहेत. राजनाथ सिंह हे देशाचे संरक्षणमंत्री आहेत, पण आता ते धर्मेंद्र प्रधानांचं रक्षण करत होते. आपले खड्डेमंत्री माफ करा, रस्तेमंत्री नितीन गडकरी हे इथेनॉलवर बोलत आहेत, असे उद्धव ठाकरे यांनी म्हटले. मला मोदींना सांगायचं आहे की, तुम्हाला तुमच्या लाडक्या धर्मेंद्र प्रधानांना मंत्रिमंडळातून काढताना किती यातना झाल्या. त्यापेक्षा जास्त यातना नीट पेपरफुटीनंतर आत्महत्या केलेल्या मुलांच्या कुटुंबीयांना झाल्या असतील, असे उद्धव ठाकरे यांनी सांगितले.



### 'जेन झी'ने उपटल्या सरकारच्या झिंज्या - राज ठाकरे

तुम्ही जे आंदोलन देशभरात पेटवलं आणि त्याला जे यश आलं त्याचा आनंद साजरा करण्यासाठी आपण इथे जमलेलो आहोत. या देशातील जेन झी सरकारच्या झिंज्या कशा उपटते, हे या आंदोलनातून कळाले, असे राज ठाकरे यांनी म्हटले. यावेळी राज ठाकरे यांनी नीट पेपरफुटीनंतर आत्महत्या केलेल्या २१ तरुणांची नावं वाचून दाखवत त्यांच्या आत्म्याच्या शांतीसाठी मौन बाळगण्याचे आवाहन केले.

### दिल्ली अन् मुंबई पोलिसांत जमीन-आसमानाचा फरक

आपल्या भाषणाचा शेवट करताना राज ठाकरे यांनी मुंबई पोलिसांचे विशेष आभार मानले आणि त्यांच्या संयमी कामगिरीचे कौतुक केले. 'या संपूर्ण आंदोलनादरम्यान मुंबई पोलिसांनी दाखवलेली शिस्त आणि सहकार्य वाखाणण्याजोगे आहे. दिल्लीतील पोलीस आंदोलकांशी वागणूक देतात आणि आपले मुंबई पोलीस कसे वागतात, या दोन्हीतील फरक आज संपूर्ण देशाला स्पष्टपणे दिसला आहे,' असे म्हणत त्यांनी मुंबई पोलिसांच्या कार्यशैलीची प्रशंसा केली.

### ..पण माणसं चोरता येणार नाहीत!

निवडणुकांना आणखी दोन-अडीच वर्षे शिल्लक आहेत. पण निवडणुका गेल्या खड्ड्यात, मोदीना मतं चोरता येतील, पण माणसं चोरता येणार नाहीत. ही ठिणगी आता जागती ठेवणं आपल्या सगळ्यांचे काम आहे. देशातील तरुणाईने देशाच्या इतिहासातील सुवर्ण पान लिहिले आहे. आता आलेली ही जाग जाऊ देऊ नका, सत्ताधाऱ्यांची मस्ती सहन करु नका, असेही उद्धव ठाकरे तरूणाईला साद घालत असताना म्हणाले.

# शिंदे सेनेच्या पदाधिकाऱ्याचा अपघातात संशयास्पद मृत्यू!

## माजी जिल्हाप्रमुखानेच घातपात केल्याचा कुटुंबीयांचा आरोप

प्रतिनिधी २६ जुलै

**अकोला :** शहरातील शिंदेंच्या शिवसेनेचे अल्पसंख्यांक आघाडीचे जिल्हाध्यक्ष शेख मोहसीन शेख समद यांच्या मृत्यू प्रकरणाने जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. यात पक्षाचे माजी जिल्हाप्रमुख मंगेश काळे यांच्यावरच हत्येच्या कटाचा आरोप मृतकाच्या कुटुंबीयांनी केला आहे. मंगेश काळे यांच्या अटकेसाठी रात्री खदान पोलीस स्टेशनमध्ये मृतकाच्या कुटुंबीयांनी धडक दिली.

२३ जुलै रोजी संध्याकाळी शहरातील नेहरू पार्क परिसरात शिंदेंच्या शिवसेनेचे अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष शेख मोहसीन यांच्या दुचाकीला मागून आलेल्या एका चारचाकी वाहनाने जोरदार धडक दिली होती. या अपघातात गंभीर जखमी झालेल्या मोहसीन यांचा शनिवार, २५ जुलै रोजी रात्री



उपचारादरम्यान मृत्यू झाला. मात्र, हा अपघात नसून सुनियोजित घातपात असल्याचा गंभीर आरोप मृतकाच्या कुटुंबीयांनी केला आहे. विशेष म्हणजे, शिंदे गटाचे माजी जिल्हाप्रमुख मंगेश काळे यांनीच वाहनाने धडक देत मोहसीन यांची हत्या केल्याचा थेट आरोप कुटुंबीयांनी केला आहे. घटनेनंतर संतप्त नातेवाईक, समर्थक आणि नागरिकांनी खदान पोलिस ठाण्यासमोर मोठी गर्दी करत निष्पक्ष तपासाची मागणी केली. आरोपींवर खुनाचा गुन्हा दाखल करावा, अन्यथा आंदोलन तीव्र करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. दरम्यान, पोलिसांनी या प्रकरणाचा सर्व बाजूंनी तपास सुरू केला आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज जप्त करण्यात आले आहे. हा अपघात होता की पूर्वनियोजित घातपात, याचा उलगडा तपासानंतरच होणार आहे. सध्या या प्रकरणातील आरोप हे कुटुंबीयांकडून करण्यात आलेले असून त्याबाबत पोलिसांकडून कोणतीही अधिकृत पुष्टी करण्यात आलेली नाही. त्यामुळे तपासाच्या निष्कर्षाकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. या घटनेमुळे सध्या जिल्ह्यात तणावाचे वातावरण आहे.

### एकनाथ शिंदेंनी केले मृतक कुटुंबीयांचे सांत्वन

शिंदे सेनेचे अल्पसंख्यांक आघाडीचे जिल्हाध्यक्ष शेख मोहसीन शेख समद यांच्या मृत्यूची माहिती समजताच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दूरध्वनीवरून अकोल्यातील शिवसेनेचे पदाधिकारी यांच्या संपर्क साधून दुःख व्यक्त केले. तसेच शेख मोहसीन यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन करीत या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याचे आश्वासन देत पोलिसांच्या तपासावरून योग्य ती कारवाई करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. यामुळे कुटुंबीयांना दिलासा मिळाला आहे.

### प्रकरणाला मिळाले वेगळे वळण!

कुटुंबीयांच्या आरोपांमुळे या प्रकरणाला आता वेगळेच वळण मिळाले आहे. या प्रकरणात त्यांनी माजी जिल्हाप्रमुख मंगेश काळे यांच्यावर थेट आरोप करत त्यांच्याविरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. मंगेश काळे हे पक्षाचे माजी जिल्हाप्रमुख असून माजी नगरसेवक आहेत. सध्या त्यांच्या पत्नी सुरेखा काळे या महापालिकेत नगरसेविका आहेत.

# 'उशिरा का होईना, पण झाले हेच बरे झाले..!'

## मुरली मनोहर जोशी यांचा घरचा आहेर

प्रतिनिधी २६ जुलै

**दिल्ली :** नीट-यूजी परीक्षा घोटाळा आणि त्यानंतर उसळलेल्या प्रदीर्घ संघर्षानंतर अखेर केंद्रीय शिक्षणमंत्र्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. गेल्या १२ वर्षांच्या मोदी सरकारच्या कार्यकाळात एका मंत्राने दिलेला हा पहिलाच राजीनामा असून भाजपला हा एक धक्का असल्याचे मत राजकीय वर्तुळात उमटत आहे. यावर विरोधकांनी टीकेची झोड उठवली असताना आता भाजपच्या एका जेष्ठ नेत्याने सरकारला घरचा आहेर दिला आहे. धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याबाबत भाजपचे ज्येष्ठ नेते मुरली मनोहर जोशी यांनी 'उशिरा का होईना, पण झाले हेच बरे झाले' असे म्हणत आपली प्रतिक्रिया दिली आहे. मुरली मनोहर जोशी यांनी ट्विटरवर या विषयावर भाष्य करत प्रतिक्रिया दिली आहे. दिल्लीतील जंतर मंतर येथील आंदोलन संपले असून, सरकारने विद्यार्थ्यांच्या सर्व मागण्या मान्य केल्या आहेत. शनिवारी धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर, आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्या सीजेपीच्या शिष्टमंडळाने केंद्रीय मंत्री जेपी नड्डा आणि जितेंद्र सिंह यांच्याशी पुन्हा एकदा आपल्या मागण्यांवर चर्चा केली आणि त्या त्यांच्यापर्यंत पोहोचवल्या, ज्याला दोन्ही नेत्यांनी सरकारच्या वतीने सहमती दर्शवली. अशातच धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याबाबत भाजपचे ज्येष्ठ नेते मुरली मनोहर जोशी यांनी ट्विटर पोस्ट करत म्हटले आहे की, 'उशिरा का होईना, पण झाले हेच बरे' पुढे ते पंतप्रधानांना सल्ला देताना ते म्हणाले, 'मला आशा आहे की पंतप्रधानही या विषयावर लवकरच वेळेवर निर्णय घेतील; विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना त्यांनी लिहिले की, 'शांततेने आंदोलन संपवल्याबद्दल सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन. मला आशा आहे की भारतीय शिक्षण क्षेत्रात लवकरच शांतता प्रस्थापित होईल आणि विद्यार्थ्यांना त्यांच्या उज्वल भविष्यासाठी आणि प्रगतीसाठी भरपूर संधी मिळतील.'

# अखेर त्या पीडित तरुणीचा मृत्यू..!

## मृत्यूस जबाबदार पोलिस शिपायाला अटक केव्हा ?

प्रतिनिधी २६ जुलै

**बाळापूर :** शहरातील एका तरुणीला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर अत्याचार करण्यात आला. त्यामुळे तरुणीने आत्महत्येचा प्रयत्न केला असता त्याला वाचविण्यात आले होते. मात्र तिची प्रकृती चिंताजनक होती. अखेर तिची मृत्यूशी झुंज अपयशी ठरल्याने शनिवार, २५ जुलै रोजी तिचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. पीडित तरुणीच्या मृत्यूस जबाबदार आरोपी पोलीस शिपायास अटक केव्हा, असा प्रश्न बाळापूर शहरवासी करीत आहेत.

लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार व छळ केल्यामुळे आत्महत्येचा प्रयत्न करणारी पीडित तरुणी कोमात होती, अखेर तिची मृत्यूशी दिलेली झुंज अपयशी ठरली. तिचा मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे बाळापुरात नागरिकांचा उद्रेक पाहायला मिळत असून बाळापूर उपविभागीय अधिकाऱ्यांनी आरोपीला अटकेसाठी तीन पथके पाठविल्याचे सांगितले



आहे. बाळापूर पोलीस ठाण्यातील आरोपी पोलिस शिपाई पवन वडगावे याच्या अत्याचार व त्रासाला कंटाळून तरुणीने आत्महत्येचा प्रयत्न केला होता. गंभीर दुखापतीमुळे ती रुग्णालयात कोमात होती, शनिवारी तिचा मृत्यू झाला. तरुणीच्या मृत्यूनंतर आता पोलिस प्रशासनाकडून आरोपीवर कडक कायदेशीर कलमे वाढवण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन आरोपी पवन वडगावे याला पोलिस सेवेतून बडतर्फ करण्याची तयारी सुरू करण्यात आली आहे. फरार आरोपीला शोधण्यासाठी पोलिसांची ३ विशेष पथके रवाना करण्यात आली असून लवकरच त्याला बेड्या ठोकल्या जातील, अशी माहिती त्यांनी दिली. पीडित कुटुंबाच्या दुखात पोलिस प्रशासन सहभागी असून कोणत्याही दोषीला पाठीशी घातले जाणार नाही, असा विश्वास अधिकाऱ्यांनी दिला आहे.

### आरोपीच्या अटकेसाठी तीन विशेष पथके

पीडित तरुणीला न्याय मिळावा, यासाठी दोन दिवस आधीच संपूर्ण बाळापूर शहर एकवटले होते. सर्व समाज, पक्ष व संघटनांनी उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांच्या कार्यालयावर मोठ्या प्रमाणात निदर्शने व धरणे आंदोलन केले होते. आता त्या तरुणीच्या मृत्यूमुळे समाजात संतप्त वातावरण निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पीडित तरुणीवर अत्याचार करणाऱ्या आरोपी पोलिस शिपायाला सेवेतून बडतर्फ करणार असून, आरोपी पवन वडगावे याच्या अटकेसाठी पोलिसांची ३ विशेष पथके रवाना करण्यात आली आहेत.

# शहांना स्वत: पंतप्रधान व्हायचंय - खा. संजय राऊत

प्रतिनिधी २६ जुलै

**मुंबई :** दिल्लीत जंतर-मंतरवर पोलिसांनी मुलांवर हल्ला केला, मुलीचे कपडे फाडले, आक्षेपार्ह पद्धतीने स्पर्श केला, त्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह जबाबदार आहेत. अमित शाह यांना तातडीने देशाचे उपपंतप्रधान बनायचे आहे, त्यानंतर त्यांना पंतप्रधान व्हायचं आहे, त्यासाठी हे सगळं चालू आहे. अमित शाह यांना मोदींना बदनाम करायचं आहे, ही आतल्या गोटातील माहिती आहे, असा खळबळजनक दावा शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे.

धर्मेंद्र प्रधान यांनी केंद्रीय शिक्षण मंत्रिपदाचा राजीनामा दिल्यानंतर राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्याकडून आज तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. याबाबत विचारले असता संजय राऊत म्हणाले की, '२० ते २१ मुलं या लढ्यात बळी पडले आहेत, त्यांनी आत्महत्या केल्यात, लाठ्या खाल्लेल्या आहेत, त्यांचे डोके फुटलेली आहेत, काही लोकांची दृष्टी गेली आहे. आनंद



साजरा करताना ही गोष्ट विसरता येणार नाही. तरीही आज शिवाजी पार्कवर उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी तिरंगा रॅलीचे आयोजन केले आहे. सगळ्यांना धन्यवाद देण्यासाठी एका रॅलीचे आयोजन केलेले आहे. कोणत्याही पक्षाचा झेंडा तिथे फडकणार नाही. तिथे सर्वांनी यावे, तिथे व्यासपीठ नाही; तिथे फक्त दोन भाषण होतील. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे प्रमुख राज ठाकरे यांचे भाषण होईल.' आदित्य ठाकरे यांनी धर्मेंद्र प्रधान यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली होती. याबाबत विचारले असता राऊत म्हणाले, 'आदित्य ठाकरे यांची भूमिका अत्यंत योग्य आहे. धर्मेंद्र प्रधान यांच्या हलगर्जीपणामुळे पेपर फुटले आणि २० जणांवर आत्महत्या करण्याची वेळ आली.

# युनियर स्क्वॉश वर्ल्ड चॅम्पियनशिप जिंकणारी पहिली भारतीय

## अनाहतने रचला इतिहास, भारताच्या शिरपेचात मानाचा तुरा



प्रतिनिधी २६ जुलै

**नवी दिल्ली:** संपूर्ण देशाचे लक्ष कॉमनवेल्थ गेम्स २०२६ कडे लागलेले असताना, वयाच्या १८ व्या वर्षी भारताची अनाहत सिंग हिने एक ऐतिहासिक आणि अभूतपूर्व कामगिरी केली आहे. कॅनडामध्ये झालेल्या ज्युनियर स्क्वॉश वर्ल्ड चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीत धडक मारत तिने विजेतेपदावर मोहोर उमटवली. हा जागतिक किताब जिंकणारी ती पहिली भारतीय खेळाडू ठरली आहे. अनाहतच्या या ऐतिहासिक विजयानंतर भारताच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. अंतिम सामन्यात अनाहतची लढत इजिप्तच्या दुसरी मानांकित खेळाडू सलमा सालेम हिच्याशी होती. या अटीतटीच्या सामन्यात अनाहतने सलग तीन सेट जिंकत प्रतिस्पर्धी खेळाडूला चारीमुंड्या चित केले. पहिल्या सेटमध्ये अनाहतने ११-३ अशा मोठ्या फरकाने विजय मिळवला. त्यानंतर दुसऱ्या सेटमध्ये तिने आपले वर्चस्व कायम राखत ११-७ ने बाजी मारली. अत्यंत चुरशीच्या ठरलेल्या तिसऱ्या सेटमध्ये अनाहतने ११-९ असा विजय मिळवत ऐतिहासिक विजेतेपदावर नाव कोरले.

### २१ वर्षांनंतर भारताला यश

» विशेष म्हणजे, तब्बल २१ वर्षांनंतर या स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहोचणारी आणि विजेतेपद पटकावणारी अनाहत पहिली भारतीय ठरली आहे. यापूर्वी २००५ मध्ये जोशना चिनप्पाने या स्पर्धेची अंतिम फेरी गाठली होती, मात्र तिला विजेतेपद मिळवण्यात अपयश आले होते. आता अनाहतने हा दुष्काळ संपवत नवा इतिहास रचला आहे.

### ऑलिम्पिक २०२८ साठी आशा पल्लवित

» दरम्यान, २०२८ मध्ये लॉस एंजेलिस येथे होणाऱ्या ऑलिम्पिक स्पर्धेत स्क्वॉश या खेळाचाही समावेश करण्यात आला आहे. अनाहतच्या या विजयामुळे ऑलिम्पिकमधील भारताच्या पदकांच्या आशा पल्लवित झाल्या असून तिचा आत्मविश्वासही नक्कीच दुणावला असेल. सध्या ती वरिष्ठ पीएसए टूरच्या जागतिक क्रमवारीत टॉप-२० खेळाडूंमध्ये समाविष्ट असून, तिला आपली रँकिंग आणखी सुधारण्याची मोठी संधी आहे.

# पेलेट गन वापरण्याची परवानगी कोणी दिली : राहुल गांधी

प्रतिनिधी २६ जुलै

**नवी दिल्ली :** दिल्लीतील जंतर-मंतर येथे २० जुलै रोजी शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या अमानुष हल्ल्याची जबाबदारी निश्चित करण्याची मागणी करत, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना पत्र लिहिले आहे. राहुल गांधी यांनी पत्रात दावा केला की, आंदोलनादरम्यान पेलेट गनचा वापर करण्यात आला असून, १९ वर्षीय एका विद्यार्थ्याच्या डोळ्याला गंभीर दुखापत झाली आहे. या विद्यार्थ्याची दृष्टी जाण्याची शक्यता असल्याचाही त्यांनी उल्लेख केला. पत्रात राहुल गांधी यांनी अमित शाह यांना दोन प्रश्न विचारले आहेत. "दिल्लीतील सुरक्षा यंत्रणा अखेर गृहमंत्रालयाच्या अखत्यारीत येते. त्यामुळे गृहमंत्री म्हणून विद्यार्थ्यांवर पेलेट गन वापरण्यास तुम्ही मंजुरी दिली होती का? जर नाही, तर ही परवानगी कोणी दिली?" असा सवाल त्यांनी केला आहे. याशिवाय आंदोलनादरम्यान साध्या वेशातील काही व्यक्ती विद्यार्थ्यांना लाठ्यांनी मारहाण करताना दिसत असल्याचा उल्लेख करत, "हे लोक पोलीस कर्मचारी होते की स्वयंसेवक?" त्यांची नियुक्ती कोणी केली?" अशीही विचारणा राहुल गांधी यांनी केली. लोकशाहीत शांततापूर्ण आंदोलन हा नागरिकांचा मूलभूत अधिकार असल्याचे नमूद करत राहुल गांधी म्हणाले की, आंदोलकांचे संरक्षण करणे आणि त्यांच्या मागण्यांवर संवादातून तोडगा काढणे ही सरकारची जबाबदारी आहे. विद्यार्थ्यांवर झालेली हिंसक कारवाई लोकशाहीच्या सर्व मर्यादा ओलांडणारी असून, देशभरात संतापाची लाट उसळल्याचेही त्यांनी पत्रात म्हटले आहे. दरम्यान, राहुल गांधी यांनी शनिवारी सरकारवर जोरदार टीका केली. त्यांनी दिल्लीतील आंदोलनादरम्यान जखमी झाल्याचा दावा करण्यात आलेल्या साहिल नावाच्या विद्यार्थ्याचा व्हिडिओ शेअर केला.

## पावसाची शक्यता: निसर्गाचे गूढ आणि आशेचा अंकुर

उकाड्याने हैराण झालेल्या धरणीला आणि सर्व जीवांना वेध लागतात ते एकाच गोष्टीचे—पाऊस! आकाशात काळेकुट्ट ढग जमा होऊ लागले आणि थंड वाऱ्याची झुळूक अंगाला स्पर्शून गेली की, प्रत्येकाच्या मनात एकच ओढ निर्माण होते: “आज पावसाची शक्यता आहे!” पावसाची फक्त शक्यता असणेसुद्धा मानवी मनाला आणि निसर्गाला एक वेगळाच दिलासा देऊन जाते. निसर्गाचे बदलणारे रूप- पाऊस येण्यापूर्वी निसर्गात होणारे बदल अत्यंत मनमोहक असतात. उन्हाच्या तापाने करपलेली झाडे-झुडपे आकाशाकडे डोळे लावून बसलेली असतात. अचानक वाऱ्याची दिशा बदलते, हवेत ओलसरपणा येतो आणि मातीचा तो गंध—ज्याला आपण ‘मृद्गंध’ म्हणतो—हळूच आसमंतात पसरू लागतो. मोरांचा टाहो आणि पक्ष्यांचा किलबिलाट वाढतो. हा बदल पावसाच्या शक्यतेचा संदेश देणारा असतो.

# विद्याभारती-अमृत महोत्सवाच्या निमित्ताने !!

यंदा रा.स्व.संघाला शंभर वर्ष तर विद्या भारती अखिल भारतीय शिक्षा संस्थानला स्थापन होऊन पंच्याहत्तर वर्ष होत आहेत.विद्या भारती विदर्भ ला स्थापनेची पंचवीस वर्ष पूर्ण होत आहेत.शताब्दी,अमृत आणि रौप्य महोत्सवाचा हा त्रिवेणी योग आहे. विद्या भारती अखिल भारतीय शिक्षा संस्थान हे शैक्षणिक संघटन माहीत नाही असा व्यक्ती भारतात विरळाच असेल. विद्या भारती हे शिक्षण क्षेत्रातील सर्वात मोठे गैरराजकीय संघटन असून “ भारतात शिक्षण आणि शिक्षणात भारत “ हा निर्भेळ हेतू डोळ्यासमोर ठेवून १९५२ ला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे द्वितीय सरसंघचालक प.पु.श्री गुरुजी यांच्या प्रेरणेतून आणि प्रचारक भारतरत्न कै.नानाजी देशमुख,कै.भाऊराव देवरस आणि त्यांचे सहकारी यांच्या परिश्रमाने “ सरस्वती शिशू मंदिर “ सुरू करून विद्या भारतीचा प्रारंभ झाला.उत्तर प्रदेशातील गोरखपूर येथे शिशू मंदिराच्या माध्यमातून एक छोटे बीज लावण्यात आले.१९७७ ला अखिल भारतीय शिक्षा संस्थानच्या रूपात विद्याभारतीने राष्ट्रीय स्वरूप घेतले.आता ते “ वाढता वाढता वाढे,भेदीले शून्य मंडळा “ झाले.

**इवल्याश्या या रोपाचा वेलू किती गगनाला भिडला हे सांगण्यासाठी हा लेखन प्रपंच.**

विद्या भारतीचा कार्य विस्तार आकाशाला भिडला आहे.

देशातील एकूण ७७८ जिल्ह्यांपैकी विद्या भारतीचे ६८४ जिल्ह्यात सक्रिय कार्य असून उर्वरित जिल्हे संपर्कित जिल्हे आहेत.देशभरात एकूण ६६ प्रांत समिती आहेत. विद्याभारती द्वारा संचालित एकूण औपचारिक विद्यालय १२,११८ तर अनौपचारिक विद्यालय ९३९६ असे एकूण २१५१४ विद्यालय आहेत.औपचारिक विद्यालयात एकूण १,४४,४२५ आचार्य तर अनौपचारिक विद्यालयात ९४१५ आचार्य असे एकूण १,५३,८४० आचार्य म्हणजे शिक्षक कार्यरत आहेत.या सर्व विद्यालयात एकूण ३५,३३,९२२ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

**विद्याभारती द्वारा संचालित एकूण ६० महाविद्यालये आहेत.**

म्हणजे देशभरातील ८८ % जिल्ह्यात विद्याभारतीचे कार्य सुरू आहे.चारित्र्यसंपन्न मनुष्यनिर्माणाचे कार्य या माध्यमातून केले जाते.

विद्या भारतीच्या “ हमारा लक्ष्य “ मध्ये याबाबत स्पष्ट उल्लेख आहे की राष्ट्रीय शिक्षण प्रणालीचा विकास,राष्ट्रभक्तीने ओतप्रोत आणि शारीरिक,प्राणिक,मानसिक,बौद्धिक आणि आध्यात्मिक दृष्टीने विकसित युवा पिढी निर्माण करणे,समरस समाज,वसुधैव कुटुंबकम् चे भावजागरण,विश्व कल्याणासाठी समर्पित आणि सज्ज पिढी निर्माणाचे कार्य विद्या भारती करीत आहे. अखिल भारतीय स्तरावर होणाऱ्या विविध उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये होणारे संस्कार “ हमारा लक्ष “ कडे वाटचाल असून विद्या भारतीचे विविध उपक्रम आणि आयाम भारताला समर्थ बनवतील असेच आहेत.

**यावर्षीच्या सत्रात विद्याभारतीचे उपक्रम याची साक्ष देतील.**

यंदा मध्यप्रदेशातील सतना येथे ३५ वा अखिल भारतीय खेलकुद समारोह झाला.मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री डॉ.मोहन यादव आणि ऑलिम्पिक विजेते श्री.योगेश्वर दत्त यांच्या उपस्थितीत झालेल्या या समारोहाला देशभरातून विविध प्रांतातून बाल,किशोर,तरुण भाऊ बहिण ७७० पारंगत खेळाडू सहभागी झाले होते.

जयपूर राजस्थान येथे अखिल भारतीय विज्ञान मेला आयोजित करण्यात आला होता.राजस्थान चे शिक्षण मंत्री श्री.मदनजी दिलावर यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या मेळ्यात देशभरातून निवड झालेले एकूण ५९५ विद्यार्थी सहभागी झाले होते. ओरिसातील अनगुल येथे अखिल भारतीय गणित मेळ्याचे आयोजन तर उज्जैन मध्यप्रदेश येथे १६ वा अखिल भारतीय संस्कृती महोत्सव संपन्न झाला.

अखिल भारतीय स्तरावर नीती आयोग,AICTE,उन्नत भारत आणि विद्याभारती यांच्या संयुक्त विद्यमाने अटल टिंकरिंग लॅब चे आयोजन आयआयटी नवी दिल्ली येथे करण्यात आले होते.भारतीय विज्ञान आणि आधुनिक विज्ञान यांची सांगड घालून शुद्ध वैज्ञानिक दृष्टिकोन यातून निर्माण होणार आहे. आसामची राजधानी गौहाटी येथे पूर्वोत्तर क्षेत्राचे बाल महाकुंभ आयोजित केला होता.प्रचंड संख्येत बाल विद्यार्थी उपस्थित असलेल्या या बालसंगमला आसामचे मुख्यमंत्री श्री.हेमंत शर्मा,रा.स्व.संघाचे सह सरकार्यवाह मा.कृष्ण गोपालजी उपस्थित होते.

विद्याभारती अविरत आणि अथक प्रयत्नांची उपलब्धी म्हणजे राष्ट्रीय व्यावसायिक शिक्षण प्रशिक्षण परिषद ( NCVET) ,कौशल्य विकास आणि उद्यमिता (MSDE) यांच्या द्वारा विद्या भारतीला आता प्रमाणिकरण संस्था म्हणून मान्यता मिळाली आहे.त्यातून आत्मनिर्भर भारत निर्माण होण्यास चालना मिळेल.

**विद्याभारती निरनिराळ्या चार केंद्रीय विषयावर कार्य करते .**

प्रशिक्षण,मानक परिषद,विद्वत परिषद आणि शोध हे ते विषय.यासंदर्भात यशस्वी कार्यशाळा पार पडल्या.त्याची उपलब्धी शिक्षण क्षेत्रात ठळक दिसते. विद्याभारतीच्या शाळेत शिकून गेलेल्या विद्यार्थ्यांची “ पूर्वछात्र परिषद “ ही महत्वपूर्ण असून याद्वारे अनेक उच्चपदस्थ अधिकारी,नागरिक विद्याभारतीमुळे यशस्वी झाल्याचे लक्षात येते.जवळ जवळ ८६ देशात असलेले सर्व पूर्वछात्र राष्ट्रकार्यात योगदान करतात. शिशूवाटिका परिषदेच्या माध्यमातून प्रभावी शिशूवाटिकांसाठी योजना क्रियान्वित करण्यात येताहेत.देशभरात भारतीय संस्कार देणाऱ्या शिशुवाटिका याची साक्ष देतात. याशिवाय भारतात शिक्षण तर शिक्षणात भारत हवा.तो आतापर्यंत दिसत नव्हता. त्यासाठीच “ राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० “ तयार झाले. ते तयार करण्यात विद्याभारतीचा सिंहाचा वाटा आहे. आता त्याचे क्रियान्वयन व्हावे म्हणून देशभर शिक्षण संस्थामध्ये जावून चर्चा,परिसंवाद ,व्याख्याने,प्रत्यक्ष कार्यशाळा विद्या भारती करीत आहे. पंचकोश विकास आणि त्यासाठी पाच आधारभूत विषय शारीरिक शिक्षण,योग,संगित,संस्कृत आणि नैतिक आध्यात्मिक शिक्षण.या विषयाच्या माध्यमातून शिक्षणाची पंचपदी.या सर्वांसाठी शिक्षकांचे प्रशिक्षण देशभर हजारोंच्या संख्येत विद्याभारती घेत आहे.

शिक्षणात नैतिक अध्यात्मिक शिक्षण महत्त्वाचे म्हणून विविध अध्यात्मिक संघटन,गुरु,मठ यांच्यासोबत विचार संगोष्ठी आयोजित करण्यात आली.यात महर्षी महेश योगी वेद विज्ञान विद्यापीठ,रामकृष्ण मिशन,श्रीमाता अमृतानंदमयी विश्वविद्यालय,योगी अरविंद आश्रम,गायत्री परिवार यासारख्या संस्थांचा सहभाग होता.

विद्या भारतीने लोकमाता देवी अहिल्या त्रिशताब्दी साजरी केली.यात संपूर्ण देशात ४९१० कार्यक्रम घेतले.५४८०६५ इतक्या लोकांनी सहभाग नोंदवला.

विदर्भातही विद्याभारतीचे कार्य सर्व जिल्ह्यात असून विविध उपक्रमातून “ सा विद्या या विमुक्तये “ साठी अचूक वाटचाल सुरू आहे. “ संस्कृती बोध परियोजना “ अर्थात संस्कृती ज्ञान परीक्षेच्या माध्यमातून विदर्भातील सर्व जिल्ह्यातील अनेक शाळातून हजारो विद्यार्थी परीक्षेला बसतात. खेळकुद मध्ये तर विदर्भाचे नाव देशपातळीवर गेले आहे.एथलेटिक्स आणि बॉक्सिंग मध्ये वैदिक गणित हा विषय घेऊन विदर्भातील अनेक जिल्ह्यामध्ये कार्यशाळा संपन्न होताहेत.वैदिक गणित हा आपल्या भारतीय शिक्षणाचा प्राण आहे.

**विद्यावाचस्पती प्रा.दिलीप जोशी,**
वाशिम. ९८२२२६२७३५
(लेखक विद्याभारती विदर्भ प्रांत सहमंत्री आहेत)

## रथसप्तमीला सामूहिक सूर्यनमस्कार,वसंत पंचमीला सरस्वती पूजन शाळांमधून घेतल्या जाते

यंदा प्रभावी अशी “ सरस्वती शिक्षा यात्रा “ काढण्यात आली.यामध्ये विद्या भारतीशी संलग्नित शाळांच्या मुख्याध्यापक आणि कार्यकर्त्यांना घेऊन मध्यप्रदेशातील विद्याभारतीच्या प्रभावी शाळांना भेटी देण्यात आल्या.त्याचे परिणाम विदर्भातील शाळांत दिसू लागले आहेत.

विद्याभारतीशी संलग्नित शाळांच्या मुख्याध्यापकांचे प्रशिक्षण,संस्थाचालकांच्या कार्यशाळामधून नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे क्रियान्वयन होण्यास चालना मिळत असून यामुळे शैक्षणिक गुणवत्ता वाढीचे उत्तम परिणाम दिसताहेत. याशिवाय गणित,विज्ञान,मराठी ,भूगोल,इतिहास अशा विविध विषय शिक्षकांच्या कार्यशाळा देखिल परिणाम करून जातात. उन्हाळ्याच्या सुट्टीत आचार्य प्रशिक्षण वर्ग घेतल्या जातो .विदर्भाचा वर्ग यंदा वाशिम येथिल रेखाताई राष्ट्रीय विद्यालयाच्या निसर्गरम्य परिसरात पार पडला.दहा दिवस होणाऱ्या या वर्गाला विदर्भातून जवळ जवळ १५० आचार्य बंधू भगिनी उपस्थित होते.

संघशताब्दीच्या निमित्ताने शाळा शाळांत सप्तशती संगम चे आयोजन करण्यात आले होते.यामध्ये प्रत्येक शाळेतील माता पालकांना एकत्रित बोलावून त्यांना पर्यावरण महत्व,भारतीय कुटुंब व्यवस्थेबाबत प्रबोधन करण्यात आले आहे.देशभरात सप्तशती संगम चे एकूण ७५००० हजार कार्यक्रम आणि एक कोटीच्या वर माता पालकांशी संवाद झाला. विद्या भारतीच्या उपक्रमाला उपस्थित राहून उत्साह वाढविणारे महानुभाव त्यात प्रामुख्याने प.पू. सरसंघचालक डॉ.मोहनजी भागवत,सरसहकार्यवाह मा.श्री. कृष्णगोपालजी,लोकसभाध्यक्ष श्री.ओम् बिरलाजी,केंद्रीय मंत्री श्री.नितीन गडकरीजी,केंद्रीय मंत्री श्री.गजेंद्रसिंह शेखावत,मा.श्री.भैय्याजी जोशी,केरळचे राज्यपाल श्री.राजेंद्र अर्लेकरजी यांचे मोलाचे मार्गदर्शन प्राप्त झाले.

शाळा संपर्क अभियानातून विदर्भातील जवळ जवळ ९०० शाळांतून विविध उपक्रम यंदा होणार आहेत.या शिवाय वंदे मातरम गीताच्या सार्ध शतीच्या निमित्ताने २५ सप्टेंबर २०२६ ला देशभरात एकाच दिवशी सकाळी अकरा वाजता विक्रमी नोंद होईल असे सामूहिक वंदेमातरम चे गायन होणार आहे.संत रविदास यांच्या जन्माचे सहाशे पन्नासावे वर्ष त्यानिमित्त शाळा शाळातून प्रकाश वर्ष विविध उपक्रमाने साजरे करण्यात येणार आहे. विद्याभारतीचा ७५ वर्षाचा अखंड,अभंग,अव्याहत आणि अविरत प्रवास भारताला विश्वगुरू बनविण्यासाठी आहे.त्यासाठी शिक्षण प्रणाली महत्वाची आहे.” चारित्र्यसंपन्न मनुष्यनिर्माणाचे कार्य “ शिक्षणातून व्हावे हाच विद्या भारतीचा प्रयास आहे. त्यासाठीच सर्व कार्यकर्ते समर्पित आहेत.

# शेतकऱ्यांना कर्जमुक्ती प्रमाणपत्रांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते वितरण

**पंढरपूर :** ‘पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेअंतर्गत’ सोलापूर जिल्ह्यातील सात शेतकऱ्यांना कर्जमुक्ती झाल्यामुळे प्रातिनिधिक स्वरूपात कर्जमुक्तीचे प्रमाणपत्र आणि जिल्हा बँकेच्यावतीने नव्याने पीककर्जाचे धनादेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज येथे वितरीत करण्यात आले. संकटांमध्ये आलेल्या व कर्ज भरू शकला नाही अशा शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी कर्जमाफी देण्याचा शब्द राज्यशासनाने पाळला असून देशातली ही सर्वात मोठी कर्जमाफी राबविण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.



पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समिती येथे आयोजित सुधाकरपंत परिचारक राज्यस्तरीय कृषी महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार गोपीचंद पडळकर, राजेंद्र राऊत, समाधान आवताडे, अभिजीत पाटील, विजयकुमार देशमुख, उत्तमराव जानकर, नारायणराव पाटील, माजी आमदार प्रशांत परिचारक, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य, पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे चेअरमन हरीश गायकवाड आदी उपस्थित होते. राज्यातील ५६ लाख शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळणार असल्याचे सांगून मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, नियमित कर्ज भरलेल्या शेतकऱ्यांनाही त्यांच्या खात्यावर ५० हजार रुपये देण्यात येणार आहेत. कर्जमाफीची भव्य सुरुवात करण्याऐवजी पांडुरंगाच्या नगरीत जिथे शेतकरी, वारकरी इतक्या मोठ्या प्रमाणात येतात, तिथून याची सुरुवात करावी या उद्देशाने आज येथून कर्जमाफीची सुरुवात करण्यात येत आहे. त्यानुसार सहकार विभागाने १७ लाख शेतकऱ्यांची पहिली यादी जाहीर केली असून १३ हजार कोटी रुपये या शेतकऱ्यांच्या खात्यावर ३१ तारखेपूर्वीच जमा करण्यात येणार आहेत. यापुढे जसजशी बँकाकडून माहिती जमा होईल तसतशा पुढील याद्या जाहीर करून कर्जमुक्तीची रक्कम जमा करण्यात येईल. एकही पात्र शेतकरी या योजनेतून मागे राहणार नाही, असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिला.

ते पुढे म्हणाले, ७.५ हॉर्स पॉवरच्या आतील कृषीपंपांची वीजबिल माफी देण्यासाठी दरवर्षी २४ ते २५ हजार कोटी रुपये राज्य सरकार आपल्या तिजोरीतून महावितरणला देते. आता कर्जमुक्तीबरोबरच यापूर्वीची या कृषीपंपांची थकीत वीज देयकांची रक्कमही माफ करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून ५० लाख शेतकऱ्यांचं ४८ हजार कोटी रुपयांचे वीजबिल माफ केलेले आहे. आता राज्यातल्या ७५ टक्के शेतकऱ्यांना आपण दिवसा वीज देतो आहोत. येत्या डिसेंबर किंवा मार्चपर्यंत १०० टक्के शेतकऱ्यांना आम्हाला दिवसा १२ तास वीज देण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री म्हणाले, वारीची परंपरा शतकानुशतके चालली असून दरवर्षी लाखो वारकरी चालत चालत पंढरपूरपर्यंत येतात. वारीमध्ये प्रत्येकालाच पांडुरंगाचे दर्शन मिळतेच असे नसले तरी कोणी कळस दर्शन, कोणी मुख दर्शन, नामदेव पायरीचं दर्शन घेतात आणि पांडुरंगाची भेट झाल्याचा अनुभव प्रत्येक वारकऱ्याला या ठिकाणी प्राप्त होतो. वारीच्या परंपरेत प्रत्येक व्यक्ती समोरचा वारकरी, व्यक्तीमध्ये आपल्या माऊलीचे दर्शन घेत असतो. आणि अत्यंत भावनिक आणि कौटुंबिक असा वारीचा सोहळा आपल्याला पंढरपूरमध्ये पाहायला मिळतो.

यावेळी विक्रमी असे ३५ लाखांपेक्षा जास्त वारकरी पंढरपूरला येत आहेत. जवळजवळ २१ किलोमीटरची दर्शनाची रांग यावेळी लागलेली आहे. मात्र राज्य शासन, जिल्हा प्रशासनाच्यावतीने अतिशय उत्तम सेवा करण्याचा प्रयत्न केला आहे. वारकऱ्यांच्या निवाससाठी जर्मन हँगर्स, तेथे पाद्य सेवा, वैद्यकीय सेवा आदी सर्व प्रकारच्या सेवा अतिशय उत्तम पद्धतीने करण्याचा प्रयत्न केला आहे. वारीची परंपरा अशीच वाढत राहणार असून त्याप्रमाणे दरवर्षी सुविधा देण्याचे काम करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री म्हणाले. पंढरपूरच्या कॉरिडॉर विकासाची जवळजवळ सर्व तयारी झाली आहे. काही थोड्या लोकांच्या मनात शंका असल्या तरी चर्चेतून त्या सर्व शंका दूर करून सर्वांचे चांगल्यात चांगले पुनर्वसन करण्यात येणार आहे. महाराष्ट्रातल्या कुठल्याही तीर्थक्षेत्रामध्ये आजपर्यंत झालेल्या पुनर्वसनापेक्षा उत्तम, चांगलं आणि मोठं पुनर्वसन हे या ठिकाणी आम्ही पंढरपूरच्या कॉरिडॉरमध्ये देत आहोत. १०० टक्के लोकांचे समाधान करण्याचा उद्देश घेऊन हे काम आम्ही करत आहोत, असेही ते म्हणाले.

पंढरपूरमध्ये ३०-३० लाख शिस्तबद्ध पद्धतीने लोक येतात. मात्र, अपघात हा सांगून येत नाही. त्यामुळे सर्वांच्या मनामध्ये वारी संपून आणि वारकरी सुखरूप घरी जाईपर्यंत सर्व नीट व्हावे अशी एक भीती असते. या वाढत्या वारकऱ्यांकरता आणि आता देशभरातून दर्शनकरिता येणाऱ्या भाविकांची योग्य व्यवस्था व्हाव्यात, या दृष्टीने खऱ्या अर्थानं या सगळ्या व्यवस्था येथे केल्या असून पंढरपूर कॉरिडॉरमुळे चांगल्या सुविधा निर्माण होतील, असेही ते म्हणाले.

२०१५-१६ साली स्व. सुधाकरपंत परिचारक यांनी पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून या प्रदर्शनाची सुरुवात केली. पंढरपूरला येणारा वारकरी हा शेतकरी, शेतमजूर, बारा बलुतेदार आहे. म्हणून त्यांच्यापर्यंत शेतीच्या क्षेत्रातील नवीन तंत्रज्ञान, नवीन प्रयोग पोहोचले पाहिजेत, या दृष्टीने या कृषी प्रदर्शनाची सुरुवात झाली. राज्यातल्या उत्तम बाजार समित्यांमध्ये गणना होत असलेली ही बाजार समिती अतिशय उत्तम कारभार करत असून १६ कोटींपासून प्रचंड मोठी भरारी घेत समितीने मोठा विस्तार केलेला आहे, अशा शब्दात मुख्यमंत्र्यांनी बाजार समितीचा गौरव केला. मुख्यमंत्री पुढे म्हणाले, आपल्या शेतीमध्ये आधुनिकता आली पाहिजे, उत्पादनाचा खर्च कमी करता आला पाहिजे, उत्पादकता वाढली पाहिजे जेणेकरून शेतकऱ्यांचा नफा वाढला पाहिजे, अशा पद्धतीने आज आपण राज्यात वेगवेगळे प्रयोग सुरू केले आहेत. भविष्यामध्ये शेतीच्या क्षेत्रामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ताचे ( एआय) महत्त्व ओळखून, देशात पहिल्यांदा महाराष्ट्राने शेतकऱ्यांकरिता ‘महा विस्तार’ नावाचे एआय ॲप तयार केले आहे. जवळपास ५० लाख शेतकऱ्यांनी महा विस्तारवर नोंदणी केली असून उर्वरित शेतकऱ्यांनीही या ॲपवर नोंदणी करून उपयोग करावा, असे आवाहन त्यांनी केले. भीमा नदीवर बॅरेजेस बांधण्याच्या मागणीच्या अनुषंगाने बोलताना मुख्यमंत्री म्हणाले, आंतर राज्य लवादाचा निर्णयाची बंधने पाळतानाच त्यातून मार्ग काढून कशा पद्धतीने हे बंधारे तयार करता येतील, या संदर्भातले निर्देश संबंधित विभागाला देण्यात येईल. तसेच चंद्रभागा नदीवरचा जो नवीन पूल आहे, तो आता ‘पूल कम बंधारा’ असा परिवर्तित करून त्याही ठिकाणी पाणी कसे अडवता येईल, याचाही हा प्रयत्न करण्यात येईल, अशी ग्वाही देखील त्यांनी दिली. दरवर्षी कोल्हापूर आणि सांगलीमध्ये शिरणाऱ्या पुराच्या पाण्यावर डायव्हर्जन कॅनल आपण सुरू केला असून यावर्षीच त्याचे काम पूर्ण होत आहे. यामुळे ३५ ते ४० टीएमसी पाणी हे तेथून उजनीमध्ये आणण्यात येणार आहे. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यासह येथील दुष्काळी भाग आणि मराठवाड्याचा भाग या दोन्ही भागांना खूप मोठ्या प्रमाणात फायदा होईल. या पाण्यामुळे उजनीमधील मृत साठा वापरावा लागण्याची परिस्थिती पुढील काळात राहणार नाही.

रेल्वे मार्गाच्या अनुषंगाने बोलताना ते म्हणाले, पंढरपूरला तसेच सोलापूर जिल्ह्याला संपूर्ण दक्षिणेशी जोडण्याचे काम निश्चितपणे पूर्ण करू. लोणंद-पंढरपूर रेल्वेमार्गासाठी राज्यशासनाने पैसे दिले असून काम सुरू करायचे आहे. परंतु, पंढरपूर-विजापूर रेल्वेसाठीही मागील काळात केंद्र सरकारला विनंती केली असून त्याचा पाठपुरावा करण्यात येईल, असेही फडणवीस म्हणाले. पालकमंत्री गोरे म्हणाले, शेतकऱ्यांना कर्जमाफी, वीजमाफी देण्याचे काम मुख्यमंत्र्यांनी केले आहे. शेतकरी समृद्ध, मजबूत होईल अशा पद्धतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या कार्यकाळात काम केले आहे. ही वारी वारकऱ्यांना आनंद देणारी स्वच्छ आणि सुंदर अशी वारी होत आहे. जवळपास ३५ लाख वारकरी विठ्ठलाच्या दर्शनासाठी येत आहेत. पंढरीचा कॉरिडॉर च्या माध्यमातून वारकऱ्यांना सुविधा देण्यासाठी पायाभूत सोयी निर्माण करण्याचा मानस मुख्यमंत्री फडणवीस यांना केली आहे. त्यामुळे हे आंतरराष्ट्रीय तीर्थक्षेत्र होईल, असेही ते म्हणाले. यावेळी परिचारक यांनी प्रास्ताविकात मुख्यमंत्री यांनी शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी राबविलेल्या योजनांचा गौरवपूर्ण उल्लेख करत कर्जमुक्तीबद्दल मुख्यमंत्र्यांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमात मुख्यमंत्री यांच्यावरील ‘इन्फ्रामॅन : देवेंद्र फडणवीस- मेकिंग ऑफ महाराष्ट्रा’ या पुस्तकाचे तसेच निवासी मूकबधिर विद्यालय पंढरपूरच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले.

# भारतीय सैनिकांचे शौर्य, पराक्रम आणि बलिदानाला समर्पित दिवस!

## आज कारगिल विजय दिवस

कारगिल विजय दिवस हा दरवर्षी २६ जुलै रोजी कारगिल युद्धात भारताने पाकिस्तानवर मिळवलेल्या विजयाच्या स्मरणार्थ साजरा केला जातो. हा दिवस भारतीय सैनिकांचे शौर्य, पराक्रम आणि बलिदानाला समर्पित आहे. हे युद्ध १९९९ मध्ये लडाखमधील कारगिल भागात सुमारे ६० दिवस चालले. पाकिस्तानी सैन्याने आणि घुसखोरांनी लपून छपून भारताच्या सामरिक उच्च शिखरांवर ताबा मिळवला होता. भारतीय सैन्याने ऑपरेशन विजय राबवून अत्यंत बिकट आणि यू-टर्न पर्वतीय परिस्थितीमध्ये शत्रूला हुसकावून लावले व सर्व चौक्यांवर पुन्हा तिरंगा फडकवला. देशासाठी प्राण अर्पण करणाऱ्या शूर हुतात्म्यांचे स्मरण व त्यांना आदरांजली वाहण्याचा हा दिवस आहे. तरुण पिढीमध्ये राष्ट्रप्रेम आणि सैनिकांप्रती आदर निर्माण करण्याचे कार्य या दिवशी केले जाते. नवी दिल्लीतील राष्ट्रीय युद्ध स्मारक आणि देशाच्या विविध भागांत विशेष सोहळे आयोजित केले जातात.



कारगिल विजय दिवस दरवर्षी २६ जुलै रोजी भारतात साजरा केला जातो. १९९९ मध्ये लडाखमधील उत्तर कारगिल जिल्ह्यातील पर्वतांच्या शिखरांवरील पाकिस्तानी सैन्याच्या ताब्यातील ठिकाणांवरून त्यांना हुसकावून लावण्यासाठी झालेल्या कारगिल युद्धात भारताने पाकिस्तानवर मिळवलेल्या विजयाच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा केला जातो.

सुरुवातीला पाकिस्तानी सैन्याने या युद्धात आपला सहभाग नाकारला होता आणि हे युद्ध काश्मिरी अतिरेक्यांमुळे झाले असल्याचा दावा केला होता. तथापि, मृतांनी मागे सोडलेली कागदपत्रे, युद्धकैद्यांची साक्ष आणि नंतर पाकिस्तानचे पंतप्रधान नवाझ शरीफ व पाकिस्तानचे लष्करप्रमुख परवेझ मुशर्रफ यांच्या विधानांवरून जनरल अश्रफ रशीद यांच्या नेतृत्वाखालील पाकिस्तानी निमलष्करी दलांचा सहभाग असल्याचे दिसून आले.

कारगिल युद्धात लढलेल्या सैनिकांच्या सन्मानार्थ दरवर्षी २६ जुलै रोजी कारगिल विजय दिवस साजरा केला जातो. हा दिवस संपूर्ण भारतात आणि राष्ट्रीय राजधानी नवी दिल्लीत साजरा केला जातो, जिथे भारताचे पंतप्रधान दरवर्षी इंडिया गेट येथील अमर जवान ज्योती येथे सैनिकांना आदरांजली वाहतात. भारतीय सशस्त्र दलांच्या योगदानाचे स्मरण करण्यासाठी देशभरात कार्यक्रमांचे आयोजनही केले जाते. १९७१ च्या भारत-पाकिस्तान युद्धानंतर , दोन्ही शेजारी देशांच्या लष्करी दलांचा समावेश असलेले थेट सशस्त्र संघर्ष तुलनेने कमी झाले होते – तथापि, दोन्ही राष्ट्रांनी आजूबाजूच्या पर्वतरांगांवर लष्करी चौक्या स्थापन करून सियाचीन ग्लेशियरवर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न केले आणि १९८० च्या दशकात त्यातून लष्करी चकमकी झाल्या. तथापि, १९९० च्या दशकात, काश्मीरमधील फुटीरतावादी कारवायांमुळे वाढलेला तणाव आणि संघर्ष, तसेच १९९८ मध्ये दोन्ही देशांनी केलेल्या अणुचाचण्यांमुळे, अधिकाधिक युद्धखोर वातावरण निर्माण झाले. या परिस्थितीत, दोन्ही देशांनी फेब्रुवारी १९९९ मध्ये लाहोर जाहीरनाम्यावर स्वाक्षरी केली, ज्यात काश्मीर संघर्षावर शांततापूर्ण आणि द्विपक्षीय तोडगा काढण्याचे वचन दिले. १९९८-१९९९ च्या हिवाळ्यात, पाकिस्तानी सशस्त्र दलाचे काही घटक गुप्तपणे प्रशिक्षण देत होते आणि नियंत्रण रेषेच्या भारतीय बाजूच्या प्रदेशात पाकिस्तानी सैन्य आणि निमलष्करी दलांना पाठवत होते. या घुसखोरीला ‘ऑपरेशन बद्री’ असे सांकेतिक नाव देण्यात आले होते. पाकिस्तानी घुसखोरीचा उद्देश काश्मीर आणि लडाखमधील संबंध तोडणे आणि भारतीय सैन्याला सियाचीन ग्लेशियरमधून माघार घेण्यास भाग पाडणे हा होता, जेणेकरून भारताला व्यापक काश्मीर विवादावर तोडगा काढण्यासाठी वाटाघाटी करण्यास भाग पाडले जाईल. पाकिस्तानचा असाही विश्वास होता की या प्रदेशातील कोणताही तणाव काश्मीर प्रश्नाला आंतरराष्ट्रीय स्वरूप देईल , ज्यामुळे त्याला जलदगतीने तोडगा काढण्यास मदत होईल. आणखी एक उद्दिष्ट सक्रिय भूमिका घेऊन काश्मीर राज्यातील दशकाहून अधिक काळ चाललेल्या बंडाचे मनोधैर्य वाढवणे हे असू शकते.

सुरुवातीला, घुसखोरीचे स्वरूप आणि व्याप्ती याबद्दल फारशी माहिती नसल्यामुळे, त्या भागातील भारतीय सैनिकांनी घुसखोर जिहादी आहेत असे गृहीत धरले आणि त्यांना काही दिवसांत हाकलून देण्याची घोषणा केली. त्यानंतर नियंत्रण रेषेवर इतरत्रही घुसखोरी झाल्याचे उघडकीस आल्याने, तसेच घुसखोरांनी वापरलेल्या डावपेचांमधील फरकामुळे, भारतीय सैन्याच्या लक्षात आले की हल्ल्याची योजना खूप मोठ्या प्रमाणावर होती. घुसखोरीद्वारे ताब्यात घेतलेले एकूण क्षेत्र साधारणपणे १३० किमी$^2$ ते २०० किमी$^2$ दरम्यान असल्याचे मानले जाते. भारत सरकारने ‘ऑपरेशन विजय’द्वारे प्रत्युत्तर दिले, ज्यामध्ये २ लाख भारतीय सैनिकांची जमवाजमव करण्यात आली. २६ जुलै १९९९ रोजी, पाकिस्तानी सैन्याच्या तुकड्यांना त्यांच्या ताब्यातील जागांवरून हाकलून लावल्यानंतर युद्धाची अधिकृतपणे समाप्ती झाली. त्यामुळे हा दिवस कारगिल विजय दिवस म्हणून साजरा केला जातो. या युद्धात भारतीय सशस्त्र दलाचे ५२७ जवान शहीद झाले.

# विदर्भाच्या पंढरीत भाविकांची मांदियाळी

## दोन दिवसात एक लाख भाविकांनी घेतले दर्शन

प्रतिनिधी २६ जुलै

पंढरीचा वास चंद्रभागे स्नान|
आणिक दर्शन विठोबाचे ||
हेचि घडो मज जन्मजन्मांतरी |
मागणे श्री हरी नाही दुजे ||





**शेगांव :** या अमृतमय अभंग वाणी प्रमाणे विदर्भाच्या पंढरीत देवशयनी आषाढी एकादशी सोहळा मोठ्या उत्साहात व भक्ती भावपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

गण गण गणात बोते, जय हरी विठ्ठल श्री हरी विठ्ठल नामाचा गजर करत दि. २५ जुलै रोजी आषाढी एकादशी निमित्त संतनगरीत गेल्या दोन दिवसांत एक लाखाच्या जवळपास भाविक भक्तांनी श्रींच्या समाधीचे मनोभावे दर्शन घेतले. भाविकांच्या गर्दीमुळे संत नगरीत पंढरी अवतरल्याचे भासत होते. यावेळी गण गण गणात बोते ,जय जय राम कृष्ण हरीच्या जयघोषाने शहर व मंदिर परिसर दुमदुमला होता. विठ्ठलाच्या दर्शनासाठी लाखो भाविक राज्याच्या कानाकोपऱ्यातून श्री क्षेत्र पंढरपूरला जातात. परंतु काही कारणामुळे पंढरपूरला जाऊ शकत नाहीत असे लाखो भाविक आषाढी एकादशीला संत नगरीत दाखल होऊन श्रींच्या चरणी नतमस्तक होतात. त्यामुळे शेगावला विदर्भाची पंढरी म्हणून ओळखले जाते.जे भाविक पंढरपूरला जाऊ शकत नाहीत. त्यांच्यासाठी शेगाव हेच पंढरपूर आणि श्री संत गजानन महाराज हेच विठ्ठल आहेत. त्यामुळे आषाढी एकादशीला येथे लाखो भाविक श्री संत गजानन महाराजांच्या चरणी माथा ठेकवीतात. शनिवार रोजी संतनगरीत भाविकांची मांदियाळी बघायला मिळाली. विदर्भाची प्रति पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या संत नगरी शेगाव शहरात आज २५ जुलै रोजी आषाढी एकादशी निमित्त लाखो भाविकांनी श्रींच्या समाधी मंदिराचे दर्शन घेतले .विदर्भातील जे भाविक भक्त पंढरपूर येथे विठ्ठलाच्या दर्शनासाठी जाऊ शकत नाहीत असे लाखो भक्त दरवर्षी शेगाव येथे पंढरीच्या विठोबाच्या व श्री संत गजानन महाराजांच्या दर्शनानिमित्त शेगाव येथे येत असतात. आषाढी एकादशी निमित्त दि. २४ जुलै पासूनच महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून भाविकांचे जथेच्या जथे शेगाव शहरात येत होते. हजारो भाविक शेकडो किलोमीटर अंतर पायी चालत 'गण गण गणात बोते "..'जय गजानन श्री गजानन"असा जयघोष करीत शेगाव शहरात पोहोचत होते .त्यामुळे शेगाव खामगाव रोड शेगाव अकोट रोड शेगाव बाळापुर रोड शेगाव अळसना रोड, शेगाव नागझरी रोड इत्यादी सर्वच रस्त्यावर श्रींचे हजारो भक्त पैदल शेगाव कडे श्री गजानन महाराजांचे दर्शन घेण्यासाठी गण गण गणात बोते व जय गजानन श्री गजानन हे भजन गात शेगाव कडे येत असताना संपूर्ण रस्ते व शेगाव शहरातील मंदिराकडे जाणारे रस्ते गर्दीने फुलून गेले होते शेगाव शहरात श्री संत गजानन महाराज मंदिरामध्ये आज २५ जुलै रोजी आषाढी एकादशी सोहळा मोठ्या उत्साहात व भक्तीभाव पूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. बाहेरगावावरून दर्शना निमित्त शेगावला आलेल्या भाविकांना मंदिरामध्ये श्रींचे दर्शन घेताना कोणताही त्रास होऊ नये त्यांची असुविधा होऊ नये याकरिता श्री संत गजानन महाराज संस्थान कडून संपूर्ण मंदिर परिसरात भक्तांच्या सेवेसाठी जागोजागी शेकडो सेवेकरी सेवा देत होते. श्रींच्या भक्तांसाठी उत्कृष्ट अशी व्यवस्था करण्यात आली होती. त्यामुळे दोन दिवसांत जवळपास १ लाख भाविकांनी शिस्तबद्ध रीतीने श्रींचे दर्शन घेऊन हजारो भाविकांनी श्रींचे २१ अध्यायाचे पारायण सुद्धा श्रद्धापूर्वक केले. श्रींचे दर्शन व पारायण केल्यानंतर भाविकांनी श्रींच्या मंदिर परिसरात असलेल्या महाप्रसादालयामध्ये मंदिराकडून फराळाची जी व्यवस्था करण्यात आली होती.श्रींच्या पालखीचे सायंकाळ मंदिर परिसरात परिक्रमा निघून सायंकाळी श्रींच्या पालखीची आरती करण्यात आली आहे. तर दि.२४ वार शुक्रवार रोजी श्रीचे मंदिर श्रींच्या दर्शणार्थ रात्रभर खुले ठेवण्यात आले होते.तर सायंकाळी ८ ते १० किर्तन झाले आहे.

# शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा; अकोटमध्ये विद्यार्थ्यांचा जल्लोष

वि. प्रतिनिधी २६ जुलै

**अकोट :** दिल्ली येथे विद्यार्थ्यांच्या आंदोलनादरम्यान झालेल्या लाठीमाराच्या घटनेनंतर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिल्याचे वृत्त समोर येताच अकोट शहरातील विद्यार्थी, विद्यार्थिनी आणि युवकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज चौकात एकत्र येत फटाक्यांची आतषबाजी केली व पेढे वाटून आनंदोत्सव साजरा केला. यावेळी विद्यार्थ्यांनी केंद्र सरकारकडे परीक्षा प्रक्रियेत संपूर्ण पारदर्शकता आणण्याची मागणी केली. तसेच शिक्षण व्यवस्थेतील कथित भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी संबंधित अधिकारी व जबाबदार व्यक्तींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांना प्राधान्य देऊन शिक्षण क्षेत्रात आवश्यक सुधारणा करण्याची अपेक्षा उपस्थित युवकांनी व्यक्त केली. या आंदोलनात सागर तेलगोटे, शुभम तेलगोटे, अनिकेत तेलगोटे, चेतन तेलगोटे, सौरभ वानखडे, दीक्षित तेलगोटे, आकाश घनबहादूर, गौरव तायडे, मयूर मोहोड, स्वप्नील घनबहादूर, सचिन तेलगोटे, आशुतोष पळसपगार यांच्यासह अनेक विद्यार्थी व युवक सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांनी यावेळी "परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता, दोषींवर कठोर कारवाई आणि विद्यार्थ्यांना न्याय" या प्रमुख मागण्यांचा पुनरुच्चार करत शिक्षण व्यवस्थेत व्यापक सुधारणा करण्याची गरज अधोरेखित केली.




सरकार झुकले,
युवक जिंकले..!
ना पक्ष ,ना लक्ष,
न्यायासाठी दक्ष..
युवकाची क्रांती
त्यांना हवी शांती...

## Gen-Z : चांगल्याला चांगले आणि वाईटाला वाईट म्हणणारी नवी पिढी

महिन्याभरापासून आंदोलनातून लढा दिला. पोलीसाचे अत्याचार सहन केले. न्यायासाठी लढले अन् अखेर युवक जिंकले, य युवाशक्ती पुढे सरकार झुकले, हे आंदोलन ना कुण्या पक्षाची होते, ना कोणती राजकीय लक्ष होत, न्यायासाठी युवक फक्त दक्ष होते. युवकांना शांती हवी असल्यामुळे युवकांनी क्रांती केली.

प्रत्येक पिढीची एक वेगळी ओळख असते. आजची Gen-Z म्हणजे साधारणपणे १९९७ ते २०१२ दरम्यान जन्मलेली पिढी. या पिढीबद्दल अनेक मतमतांतरे आहेत. काही जण त्यांना मोबाईलमध्ये रमणारी पिढी म्हणतात, तर काही जण त्यांना बंडखोर म्हणतात. मात्र या पिढीचा एक महत्त्वाचा गुण अनेकदा दुर्लक्षित राहतो—चांगल्याला चांगले आणि वाईटाला वाईट म्हणण्याची हिंमत.

आजची Gen-Z परंपरागत राजकीय, जातीय किंवा धार्मिक चौकटीत स्वतःला अडकवून घेत नाही. अनेक तरुणांना एखाद्या व्यक्तीची जात, धर्म, पक्ष किंवा विचारधारा यापेक्षा तिचे काम महत्त्वाचे वाटते. ते प्रश्न विचारतात, पुरावे शोधतात आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून प्रत्येक घटनेकडे अनेक बाजूंनी पाहण्याचा प्रयत्न करतात.

ही पिढी आंधळ्या भक्तीवर विश्वास ठेवत नाही. सत्ताधारी पक्ष चुकीचा असेल तर त्याच्यावर टीका करण्याची हिंमत ठेवते आणि विरोधी पक्ष योग्य भूमिका घेत असेल तर त्याचे समर्थनही करते. त्यांच्यासाठी व्यक्ती किंवा पक्षापेक्षा सत्य आणि न्याय अधिक महत्त्वाचे आहेत.

याचा अर्थ असा नाही की प्रत्येक Gen-Z तरुण नेहमीच योग्य असतो. सोशल मीडियावरील अपूर्ण माहिती, अफवा किंवा भावनिक प्रतिक्रिया यामुळे अनेकदा चुकीचे निष्कर्षही निघू शकतात. त्यामुळे या पिढीने टीकेसोबतच तथ्य पडताळणी, संयम आणि जबाबदारीही तितकीच जपणे आवश्यक आहे.

तरीही या पिढीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याची तयारी. एखाद्या सामान्य माणसावर अन्याय झाला, भ्रष्टाचार झाला किंवा सत्तेचा गैरवापर झाला, तर ही पिढी सोशल मीडिया, आंदोलन किंवा लोकशाही मार्गाने प्रश्न उपस्थित करते. त्याच वेळी चांगले काम करणाऱ्याचे कौतुक करण्यासही ती मागे राहत नाही. लोकशाही केवळ मतदानाने मजबूत होत नाही; ती जागरूक नागरिकांमुळे मजबूत होते. जर तरुण पिढी व्यक्तीपेक्षा तत्त्वांना, पक्षापेक्षा संविधानाला आणि प्रचारापेक्षा सत्याला महत्त्व देत असेल, तर तो समाजासाठी सकारात्मक बदल ठरू शकतो.

आजची Gen-Z ही केवळ नवीन पिढी नाही, तर बदलाची चाहूल आहे. "चुकेल त्याला नडायचे आणि बरोबर असेल त्याच्या सोबत उभे राहायचे" हा तिचा विचार जर विवेक, तथ्य आणि जबाबदारी यांच्या आधारावर पुढे गेला, तर भारताच्या लोकशाहीला अधिक सक्षम आणि उत्तरदायी नागरिक मिळतील. हीच या नव्या पिढीची खरी ताकद आहे.


**अतिश देशमुख**
**संपादक**
**सिटी न्यूज सुपरफास्ट**
RRC city news ,वाशिम
9404833577/992266303


# खडकी रोडवर अपघातात दुचाकीस्वार गंभीर जखमी



प्रतिनिधी २६ जुलै

**अकोला :** मंगरूळपीर खडकी बु. रोडवर भरधाव टिप्परने दुचाकीला धडक दिल्याने मलकापूर येथील रहिवासी दादाराव तायडे गंभीर जखमी झाले. उपचारासाठी त्यांना रुग्णालयात दाखल केले आहे. रविवारी सकाळी हा अपघात झाला. यामुळे काही वेळेसाठी वाहतूक विस्कळीत झाली होती. अपघाताची माहिती मिळताच खडकी बु. प्रभाग क्रमांक 20 चे नगरसेवक शंकरराव लंगोटे हे घटनास्थळावर दाखल झाले. रस्त्यावर नागरिकांनी एकच गर्दी केली होती. उपस्थित नागरिकांनी रोडवर सांडलेल्या रक्तावर तातडीने मुरूम टाकला व जखमी व्यक्तीला ऑटो करून दिला. व पुढील उपचारासाठी अकोला सर्वोपचार रुग्णालयात पाठविले. सिंधी कॅम्प ते महान पर्यंत च्या रस्त्याचे चौपदरीकरण करणे आवश्यक असून लहान रस्त्यामुळे रस्त्यावर अपघाताचे प्रमाण वाढले आहे. राष्ट्रीय महामार्ग विभागाने रस्त्याचे लवकरात लवकर चौपदरीकरण करावे अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे. यावेळी नगरसेवक शंकरराव लंगोटे, प्रवीण हुंडीवाले, बंटी काळे, ऋषभ काळे यांनी विस्कळीत झालेली वाहतूक सुरळीत करण्यास मदत केली. काही वेळात वाहतूक पोलिस घटनास्थळावर दाखल झाले होते.

# मूर्तिजापुरात घरफोडी प्रकरणाचा छडा

प्रतिनिधी २६ जुलै

## तिघे आरोपी ताब्यात, मुद्देमाल केला परत



**मूर्तिजापूर :** मूर्तिजापूर शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत दाखल असलेल्या घरफोडीच्या गुन्ह्याचा पोलिसांनी छडा लावत तीन आरोपींना ताब्यात घेतले आहे. आरोपींकडून पोलिसांनी सोन्या-चांदीचे दागिने असा एकूण सुमारे १ लाख ९० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे शहरातील घरफोडीच्या घटनांना आळा घालण्यासाठी पोलिसांच्या तपास पथकाला यश मिळाले आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मूर्तिजापूर शहर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्याचा तपास सुरू होता. तपासादरम्यान पोलिसांनी संशयित आरोपींकडून गुन्ह्यातील मुद्देमाल हस्तगत केला. या कारवाईत एक सोन्याची लगड, वजन ८ ग्रॅम, अंदाजे किंमत ६० हजार रुपये, तसेच एक चांदीची लगड, वजन २०० ग्रॅम, अंदाजे किंमत ९० हजार रुपये, असा एकूण १ लाख ९० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. मुद्देमाल फिर्यादी शक्तीसिंग दिलीपसिंग ठाकूर यांच्या ताब्यात परत करण्यात आल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. या प्रकरणात आशिष ईश्वर लोडया (वय २७ वर्षे), प्रवेश राजेश शहा (वय २८ वर्षे) आणि शुभम विरेंद्र ठाकूर (वय २२ वर्षे), तिघेही रा. राधाकिसन प्लॉट, अकोला, यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक चंद्रकांत रेड्डी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती वैशाली मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. मूर्तिजापूर शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धर्मेंद्र जोशी तसेच ए एस आय उज्वल भाले यांच्या पथकाने ही कारवाई केली.

# राजराजेश्वराचा विठ्ठल स्वरूपात श्रृंगार

प्रतिनिधी २६ जुलै



**अकोला :** शहराचे आराध्य दैवत श्री राजराजेश्वराला देवशयनी एकादशी निमित्त पंढरपूरच्या विठ्ठल स्वरूपात मनमोहक श्रृंगार केला होता. प्राचीन विठ्ठल मंदिरात विठ्ठल -रुक्माई आणि राजराजेश्वर मंदिरात विठ्ठल दर्शन घेऊन भाविक प्रसन्न झाले. रविवारी रात्री उशिरापर्यंत राजेश्वर मंदिरात दर्शन घेण्यासाठी भाविकांनी गर्दी केली होती.

# कारगिल विजय दिनी मोटारसायकल रॅली

प्रतिनिधी २६ जुलै



**अकोला:** भारतीय माजी सैनिक संघटना अकोला जिल्ह्याच्या वतीने 26 जुलै रोजी सकाळी 10 वाजता हुतात्मा स्मारक नेहरू पार्क जवळ अकोला येथे संघटनेचे अध्यक्ष सुभेदार विष्णू डोंगरे यांच्या अध्यक्षतेखाली कारगिल युद्धात शहीद झालेले वीर सैनिकांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. तत्पूर्वी तिरंग्यासह मोटारसायकल रॅली काढली होती.

## शहिदांना वाहिली श्रद्धांजली

सर्व वीर माता, वीर पिता, वीर पत्नी, माजी सैनिक यांनी श्रद्धांजलीच्या कार्यक्रमात उपस्थित होते.

भारतीय जांबाज सैनिकांनी शत्रूला लढत देऊन विजय प्राप्त केला असे भारतीय माजी सैनिक संघटना जिल्हा अध्यक्ष सुभेदार विष्णू डोंगरे म्हणाले. अतिशय भावपूर्ण असा कार्यक्रम झाला.

# लागोपाठ येणाऱ्या सणांमुळे बाजारपेठेतील वाढणार उलाढाल

प्रतिनिधी २६ जुलै

**अकोला:** आषाढी एकादशी झाल्यानंतर चातुर्मासाला सुरुवात होत आहे आता येणाऱ्या पुढील 119 दिवस जप तप व्रत उपवास अशी भक्तीची पर्वणी राहणार आहे. याच काळात अनेक सण उत्सव ही साजरी करण्यात येतील यंदा 13 ऑगस्ट पासून श्रावण महिन्याला सुरुवात होत आहे यानंतर सण उत्सवांची मालिका सुरू होईल गृहस्थाश्रमी चातुर्मासात श्रावण महिना गणपती नवरात्र दिवाळी तसेच अकोला जिल्ह्यातील सर्वात मोठा सण शेवटचा श्रावण सोमवार येतो संपूर्ण अकोला जिल्ह्यात शेवटच्या श्रावण सोमवारी कावड व पालकया काढून शेवटचा सोमवार साजरा केला जातो.

## चातुर्मासात कांदा लसूण खाणे वर्ज्य



### सण व उत्सवामुळे बाजारपेठेत होईल मोठी उलाढाल

» अधिक महिना होऊन गेल्यामुळे ऑगस्ट पासून एका मागोमाग एक सण व उत्सवांची श्रृंखला सुरू होणार आहे बाजारातील वर्षाभरातील सर्वाधिक उलाढाल रक्षाबंधन ते दिवाळी या दरम्यान होत असते त्या दृष्टीने व्यापारी वर्ग तयारीला लागला आहे ग्राहकांसाठी विविध वस्तूंच्या खरेदीवर आकर्षक सवलतीच्या योजना येतील संपूर्ण बाजारपेठेत यंदाही मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाल होणे अपेक्षित आहे

### यंदा चातुर्मासच्या दोन तारखा! त्यामागील कारण काय?

» गृहस्थाश्रमी लोकांचा चातुर्मास आषाढी एकादशी पासून सुरू होतो आणि तो कार्तिकी एकादशीपर्यंत असतो तर दिनांक 29 जुलै तुला येणाऱ्या गुरुपौर्णिमेपासून संन्यासी लोकांचा चातुर्मास सुरू होत आहे हा दसऱ्यापर्यंत असतो चातुर्मासात गृहस्थाश्रमी व्यक्तींनीही भगवंताचे नाम जप दान इत्यादी कर्म नित्य क्रमाने करावीत अशी माहिती पंचांग अभ्यासक सुदर्शन शर्मा यांनी दिली

### चातुर्मासात कांदा लसूण राहणार वर्ज्य

» चातुर्मासात वर्षा ऋतू असतो या दिवसात शरीरात वात व पित्त दोष वाढतात म्हणून चातुर्मासात लसूण कांदा खाणे वर्ज आहे या दिवसात हलका आहार घ्यावा फळभाज्या खाव्यात मात्र पालेभाज्या खाऊ नयेत पोटाला वर्षा ऋतूत विश्रांतीसाठी उपवासाचे प्रयोजन केल्याची माहिती जुन्या ग्रंथात दिली आहे

# रिमशा पठाण बनली रुख्मिणी

प्रतिनिधी २६ जुलै



अवघा रंग एक झाला

**हिवरखेड :** येथील सरस्वती इंग्लिश स्कूल मध्ये आषाढी एकादशी निमित्त विद्यार्थ्यांनी विठ्ठल रुक्मिणी च्या वेशभूषा केल्या होत्या. पहिल्या वर्गातील रिमशा महबूब पठाण या चिमुकलीने रुखमाईची वेशभूषा केली होती. तर रियांश राहुल गिन्हे हा विठोबा बनला. यांच्या वेशभूषेतून धार्मिक संदेश व भाव भक्तीची इतरांना प्रेरणा देण्याचा प्रयत्न शाळेकडून करण्यात आला. अवघा रंग एक झाला असे वातावरण होते.

# डाबकी रोडवर जलवाहिनी फुटली

## काटेपूर्णा प्रकल्पातील जलसाठा चिंताजनक

प्रतिनिधी २६ जुलै



**अकोला :** जिल्ह्यात अजूनही समाधानकारक पाऊस झाला नाही. शहराला पाणीपुरवठा करणा-या काटेपूर्णा प्रकल्पाची जलपातळी गंभीर आहे. परंतु डाबकी रोडवर मात्र पाण्याचे फवारे उडताहेत. पाण्याची टंचाई लक्षात घेऊन अपव्यय होणार नाही याकडे महापालिका जलप्रदाय विभागाने त्वरित लक्ष देणे आवश्यक आहे.

डाबकी रोडवर रस्ता विस्तारीकरण सुरू आहे. रस्त्यावर खोदकाम करताना मुख्य जलवाहिनी फुटली. त्यामुळे शनिवारी सायंकाळी या भागात पाण्याचे फवारे उडत होते. हजारो लिटर पाणी वाहून गेले. सध्या पाण्याची बचत करणे आवश्यक असल्यामुळे महापालिकेच्या जलप्रदाय विभागाने दुरूस्तीकडे तातडीने लक्ष देण्याशिवाय पर्याय नाही. तसेच शहरवासीयांनी देखील निद्रिस्त यंत्रणेला जागे करण्याची गरज आहे. पाण्याचा -हास होणे योग्य नाही.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
रविवार, दि. २६ जुलै २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# बाजारभावापेक्षा कमी दराचे आमिष

## सात व्यापारी व कंत्राटदारांची ३.६८ कोटींची फसवणूक

प्रतिनिधी २६ जुलै

**उमरखेड** : बाजारभावापेक्षा कमी दरात सिमेंट, पोलाद व साखर पुरविण्याचे आमिष दाखवून सात व्यापारी व शासकीय कंत्राटदारांची तब्बल ३ कोटी ६८ लाख ८८ हजार १०१ रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी पोफाळी येथील 'आर. के. एंटरप्रायजेस'चे संचालक रामेश्वर केशव कुन्हाडे (वय ३२, रा. तरोडा, ता. उमरखेड) याच्याविरुद्ध पोफाळी पोलिसांनी भारतीय न्याय संहिता (बीएनएस) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आरोपीने पोफाळी येथे सिमेंट, पोलाद व साखरेच्या घाऊक विक्रीचा व्यवसाय सुरू केला होता. तसेच स्वत: ओएनजीसीमध्ये ज्युनिअर असिस्टंट टेक्निशियन म्हणून कार्यरत असल्याचे सांगत व्यापारी व शासकीय कंत्राटदारांचा विश्वास संपादन केला.




बाजारभावापेक्षा सिमेंटवर कमी दर, पोलादावर अल्प नफा आणि साखरेवर प्रतिक्विंटल २०० रुपये कमी दराने माल देण्याचे आश्वासन देऊन सुरुवातीला काही महिन्यांपर्यंत नियमानुसार मालाचा पुरवठा करण्यात आला. त्यामुळे संबंधितांचा त्याच्यावर विश्वास बसला.

त्यानंतर २ मे २०२५ ते २३ मार्च २०२६ या कालावधीत आरोपीने आरटीजीएस व अन्य ऑनलाइन माध्यमातून आगाऊ रक्कम स्वीकारली. मात्र, पैसे मिळाल्यानंतर मालाचा पुरवठा न करता वेळकाढूपणा करत अखेर व्यवहार बंद केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

या प्रकरणात उमरखेड, महागाव, माहूर, किनवट, हदगाव व पुसद येथील पाच व्यापारी आणि दोन शासकीय कंत्राटदारांनी संयुक्त तक्रार दाखल केली आहे. त्यामध्ये किरण शामप्रसाद दीक्षित, गजानन आगाशे, सतीश गुलाबराव भडंगे, सर्वेश गजानन मुनगीलवार, शिवराज संजय जाधव, यशवंत कदम, फैजल हारून फाजलानी, प्रदीप कनीराम जाधव व स्वप्नील रमेश पवार यांचा समावेश आहे.

तक्रारदारांनी सादर केलेल्या बँक व्यवहारांच्या कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर पोलीस उपनिरीक्षक सुरेश शिंदे यांच्या फिर्यादीवरून आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४) व ३१६(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक निलेश शेंबडे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

दरम्यान, बाजारभावापेक्षा अवाजवी कमी दरात माल देण्याच्या आमिषाला बळी पडू नये आणि मोठे आर्थिक व्यवहार करण्यापूर्वी संबंधित व्यापारी किंवा संस्थेची विश्वासार्हता तपासूनच व्यवहार करावेत, असे आवाहन पोफाळी पोलिसांनी व्यापारी व नागरिकांना केले आहे.

# सोयाबीन पिकात मृतावस्थेत आढळला तडस

## शवविच्छेदनानंतर वन विभागाकडून दहन; मृत्यूचे कारण अहवालानंतर स्पष्ट होणार

प्रतिनिधी २६ जुलै

**उमरखेड** : तालुक्यातील मेट येथील शेतशिवारात शनिवारी (दि. २५) सकाळी सोयाबीन पिकामध्ये तडस हा वन्यप्राणी मृतावस्थेत आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली. या घटनेमुळे शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून वन विभागाने घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा, शवविच्छेदन आणि दहनाची प्रक्रिया पूर्ण केली.

मेट येथील शेतकरी रवींद्र अमरसिंग राठोड यांच्या सर्वे क्रमांक ३० मधील शेतात कामासाठी गेलेल्या शेतकऱ्यांना सोयाबीन पिकात तडस मृतावस्थेत पडलेला दिसून आला. त्यांनी तात्काळ वन विभागाला याची माहिती दिली. माहिती मिळताच वन विभागाचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. गोपाल गावडे यांनी मृत वन्यप्राण्याचे शवविच्छेदन केले. त्यानंतर वन्यजीव संरक्षणाच्या नियमानुसार मृतदेहाचे दहन करण्यात आले.



वन विभागाच्या प्राथमिक माहितीनुसार, मृत तडस हा सुमारे साडेचार वर्षांचा मादी जातीचा होता. मात्र, त्याच्या मृत्यूचे नेमके कारण शवविच्छेदनाचा सविस्तर अहवाल प्राप्त झाल्यानंतरच स्पष्ट होणार असल्याची माहिती क्षेत्र सहाय्यक बी. ए. खान यांनी दिली.

ही कारवाई वनपरिक्षेत्र अधिकारी डी. एन. पवार यांच्या मार्गदर्शनाखाली क्षेत्र सहाय्यक बी. ए. खान, वनरक्षक एस. बी. ठाकरे, वनरक्षक गीते, वनरक्षक कु. नागरगोजे तसेच इतर कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत करण्यात आली.

मेट परिसरात तडससारख्या हिंस्र वन्यप्राण्याचा वावर असल्याची घटना समोर आल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंता व्यक्त होत आहे. शेतशिवारात काम करताना नागरिकांनी सतर्कता बाळगावी तसेच कोणताही वन्यप्राणी आढळल्यास त्याला इजा न करता तात्काळ वन विभागाला माहिती द्यावी, असे आवाहन वन विभागाने केले आहे.

# टाळ-मृदुंगाच्या गजरात बालवारकऱ्यांचा सहभाग

प्रतिनिधी २६ जुलै

**उमरखेड** : आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त श्री शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, पोफाळी आणि श्री गजानन महाराज भारुडी भजन मंडळ, पोफाळी यांच्या संयुक्त विद्यमाने गावातून भव्य वारकरी दिंडी काढण्यात आली. टाळ-मृदुंगाच्या गजरात, विठ्ठल-रुक्मिणीच्या जयघोषात आणि अभंगांच्या सुरावटीत निघालेल्या या दिंडीमुळे संपूर्ण पोफाळी गाव भक्तिमय वातावरणाने भारावून गेले.



विद्यालयातील इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी दिंडीत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. बालवारकऱ्यांच्या वेशातील विद्यार्थी, डोक्यावर तुळशीवृंदावन घेतलेल्या विद्यार्थिनी तसेच हातात भगव्या पताका घेऊन चालणारे विद्यार्थी हे दिंडीचे प्रमुख आकर्षण ठरले. दिंडीचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थ्यांनी साकारलेली संतांची वेशभूषा. श्री विठ्ठल-रुक्मिणी, संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज आणि संत जनाबाई यांच्या वेशातील विद्यार्थ्यांनी उपस्थितांची मने जिंकली. विद्यालयातून प्रारंभ झालेली दिंडी गावातील प्रमुख मार्गाने ग्रामपंचायत परिसरातून श्री गजानन महाराज मंदिरात पोहोचली. मार्गातील विविध चौकांमध्ये बालवारकऱ्यांनी फुगड्या खेळत भक्तिरसाचा आनंद लुटला. टाळ-मृदुंगाच्या निनादात रंगलेला हा सोहळा पाहून गावकऱ्यांना जणू प्रत्यक्ष पंढरपूरची वारी पोफाळीत अवतरल्याचा अनुभव आला. दिंडीचे गावातील विविध ठिकाणी ग्रामस्थांनी उत्स्फूर्त स्वागत केले. पालक आणि नागरिकांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. या उपक्रमाचे मुख्याध्यापक, शिक्षक-शिक्षिका, श्री गजानन महाराज भारुडी भजन मंडळ तसेच सहभागी विद्यार्थ्यांचे परिसरातून कौतुक होत आहे.

# शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा : यवतमाळात काँग्रेसचा 'विजय मार्च'





प्रतिनिधी २६ जुलै

**यवतमाळ** : केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर काँग्रेसच्या वतीने यवतमाळ शहरात कॅन्डल मार्च आणि विजयी रॅली काढण्यात आली. दिल्लीतील विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला पाठिंबा देत काँग्रेसने केलेल्या आंदोलनाला यश मिळाल्याचा दावा यावेळी पदाधिकाऱ्यांनी केला.

दिल्ली येथे विद्यार्थ्यांच्या विविध मागण्यांसाठी सुरू असलेल्या आंदोलनाला काँग्रेसने पाठिंबा दिला होता. या आंदोलनाच्या समर्थनार्थ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानासमोरही काँग्रेसकडून आंदोलन करण्यात आले होते. याच धर्तीवर जिल्हास्तरावरही आंदोलन करून केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली होती.

शिक्षण मंत्र्यांच्या राजीनाम्यानंतर यवतमाळ जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने शहरात विजयी मार्च रॅली काढण्यात आली.

यावेळी जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष ॲड. सचिन नाईक, महिला काँग्रेसच्या प्रदेश अध्यक्षा संध्या सव्वालाखे, माजी आमदार वाजहत मिर्झा, राजीव गांधी पंचायत राज संघटनेचे प्रदेश अध्यक्ष संजय ठाकरे यांच्यासह अनेक प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी प्रकाश जानकर, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष राहुल ठाकरे, जितेंद्र मोघे, प्रदेश काँग्रेस सचिव संजय वानखडे, संजय खाडे, वंदना आवारी, अशोक बोबडे, अरविंद वाढोणकर, बाजार समिती सभापती रवींद्र ठोक, शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रा. अनिल देशमुख, तालुका काँग्रेस अध्यक्ष रमेश भिसणकर आदींची उपस्थिती होती.

तसेच वसंतराव असुटकर, माजी जिल्हा परिषद सदस्य किरण मोघे, स्वाती येंढे, सीमा तेलंगे, युवक काँग्रेसच्या प्रदेश सचिव आयुषी देशमुख, शशांक केंढे, कुणाल जानकर यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते व पदाधिकारी सहभागी झाले होते. काँग्रेस कार्यकर्त्यांनी आंदोलनाच्या यशाचा आनंद व्यक्त करत शहरातून विजयी मार्च काढला.

# जंतर-मंतर प्रकरणाच्या निषेधार्थ आर्णीत मोर्चा

प्रतिनिधी २६ जुलै

**आर्णी** : दिल्लीतील जंतर-मंतर येथे विविध मागण्यांसाठी आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित पोलिस कारवाईच्या निषेधार्थ आर्णी शहरात सर्वपक्षीय पदाधिकारी, विविध सामाजिक संघटना, सामाजिक कार्यकर्ते, आर्णी युथ डेव्हलपमेंट फाउंडेशन, शिकवणी वर्गांचे शिक्षक व विद्यार्थ्यांनी मोर्चा काढून निषेध व्यक्त केला. मोर्चानंतर महामहीम राष्ट्रपतींना उद्देशून तयार करण्यात आलेले निवेदन तहसीलदार वैष्णव वाहूरवाघ यांच्यामार्फत सादर करण्यात आले.



निवेदनात जंतर-मंतर आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित मारहाणीची निःपक्षपाती चौकशी करण्यात यावी, आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत द्यावी, आंदोलनात सहभागी विद्यार्थ्यांवरील गुन्हे तातडीने मागे घ्यावेत तसेच केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा, अशा मागण्या करण्यात आल्या.

मोर्चादरम्यान विद्यार्थ्यांना न्याय मिळावा, अशी मागणी करणाऱ्या घोषणांसह आंदोलनकर्त्यांनी केंद्र सरकारविरोधात घोषणाबाजी केली. या आंदोलनात विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, विद्यार्थी, नागरिक तसेच शिकवणी वर्गांचे शिक्षक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी आंदोलनकर्त्यांनी विद्यार्थ्यांवरील कथित अन्यायाविरोधातील लढा लोकशाही मार्गाने सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला. दोषींवर कठोर कारवाई होईपर्यंत आंदोलन सुरूच राहील, असा इशाराही त्यांनी दिला.

# मुख्याध्यापक विद्यार्थ्यांसोबत धावले; 'आनंदीदायी शनिवार' उपक्रमातून तंदुरुस्तीचा संदेश

प्रतिनिधी २६ जुलै

**फुलसावंगी** : विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक तंदुरुस्ती, क्रीडाभावना आणि निरोगी जीवनशैलीची जाणीव निर्माण करण्याच्या उद्देशाने जे.एस.पी.एम. उर्दू हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज ऑफ आर्ट्स, फुलसावंगी येथे 'आनंदीदायी शनिवार' उपक्रमांतर्गत ४०० मीटर धावण्याच्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी शाळेचे मुख्याध्यापक मोहम्मद मुसद्दीक यांनी विद्यार्थ्यांना नियमित व्यायामाचे महत्त्व, शारीरिक तंदुरुस्तीचे फायदे तसेच खेळातून शिस्त, आत्मविश्वास आणि संघभावना कशी विकसित होते, याविषयी मार्गदर्शन केले. त्यानंतर विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रेरणा देण्यासाठी त्यांनी स्वतः ४०० मीटर धावण्यात सहभाग घेत विद्यार्थ्यांसोबत धाव पूर्ण केली.



मुख्याध्यापकांचा हा सहभाग विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला. त्यांच्या सोबत धावताना विद्यार्थ्यांनीही उत्साहाने स्पर्धा पूर्ण केली. या उपक्रमातून शारीरिक क्षमता वाढविण्याबरोबरच सकारात्मक स्पर्धात्मक वृत्ती, चिकाटी आणि निरोगी जीवनशैलीचा संदेश देण्यात आला.

शाळेच्या या उपक्रमाचे विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांनी स्वागत केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अभ्यासाबरोबरच क्रीडा आणि शारीरिक तंदुरुस्तीला प्राधान्य देणारे असे उपक्रम सातत्याने राबविण्याची गरज असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. शाळेने राबविलेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये व्यायाम व खेळांविषयीची आवड अधिक दृढ झाल्याचे शिक्षकांनी सांगितले.

# विठ्ठल-रुक्मिणी पूजन, वारकरी परंपरेचे दर्शन घडविणारी विद्यार्थ्यांची दिंडी

## माऊंट लिटरा झी स्कूलमध्ये आषाढी एकादशी उत्साहात

प्रतिनिधी २६ जुलै

**महागाव** : विठ्ठल-रुक्मिणी पूजनासह विद्यार्थ्यांची भक्तिमय दिंडी आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त महागाव तालुक्यातील माऊंट लिटरा झी स्कूल येथे विठ्ठल-रुक्मिणी पूजन, वारकरी परंपरेचे दर्शन घडविणारी विद्यार्थ्यांची दिंडी आणि अभंग-भजनाच्या गजरात विविध धार्मिक-सांस्कृतिक उपक्रमांचे उत्साहात आयोजन करण्यात आले. या उपक्रमामुळे संपूर्ण शाळा परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला.

यावेळी विद्यार्थ्यांनी वारकरी संप्रदायाची पारंपरिक वेशभूषा परिधान करून टाळ, मृदुंग, भगवे ध्वज हातात घेत "ज्ञानोबा-तुकाराम", "विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल" अशा जयघोषात दिंडी काढली. दिंडीतून वारकरी परंपरा, भक्ती आणि संस्कारांचा संदेश देण्यात आला.



कार्यक्रमासाठी वारकरी दत्तराव मदने आणि वामनराव हनवते यांना विशेष निमंत्रित करण्यात आले होते. संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पांडे यांच्या हस्ते विठ्ठल-रुक्मिणीच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी त्यांनी भारतीय संस्कृती, वारकरी परंपरा आणि भक्तीमूल्यांचे महत्त्व विद्यार्थ्यांसमोर विशद केले.

दिंडीदरम्यान विद्यार्थ्यांनी अभंग, भजन आणि नामस्मरण सादर करून वारकरी संप्रदायाची समृद्ध परंपरा उलगडली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये आध्यात्मिक मूल्ये, सांस्कृतिक जाणीव आणि सामाजिक एकात्मतेची भावना वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पांडे होते. यावेळी संस्थेचे सचिव परवेज सुरय्या, विशाल पांडे, वारकरी दत्तराव मदने, वामनराव हनवते, शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. मंजु जोशी, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी तसेच पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी वारकरी दत्तराव मदने आणि वामनराव हनवते यांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. उपस्थितांनी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे कौतुक करत अशा सांस्कृतिक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संस्कृतीबद्दल आदर, जिव्हाळा आणि सामाजिक बांधिलकीची भावना अधिक दृढ होत असल्याचे मत व्यक्त केले.

# गणेश विसर्जनासाठी पारंपरिक मिरवणूक मार्ग पूर्ववत करण्याची मागणी

## शांतता समिती व सार्वजनिक गणेश मंडळांचे पोलीस प्रशासनाला निवेदन; गणेशोत्सवापूर्वी निर्णयाची अपेक्षा

प्रतिनिधी २६ जुलै

**दिग्रस** : शहरातील सार्वजनिक गणेशोत्सवाची अनेक वर्षांची परंपरा कायम राखण्यासाठी गणेश विसर्जन मिरवणुकीस पूर्वीचा पारंपरिक मार्ग पुन्हा मंजूर करण्यात यावा, अशी मागणी शांतता समितीचे सदस्य आणि विविध सार्वजनिक गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी केली आहे. यासंदर्भातील निवेदन जिल्हा पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांना पोलीस निरीक्षक, दिग्रस यांच्या मार्फत सादर करण्यात आले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, सन २००७ पर्यंत गणेश विसर्जन मिरवणूक शहरातील पारंपरिक मार्गाने काढली जात होती. या मार्गावरून शहरातील प्रमुख चौक आणि बाजारपेठांमधून मिरवणूक जात असल्याने मोठ्या संख्येने भाविकांना गणेशमूर्तींचे दर्शन घेण्याची संधी मिळत होती. तसेच शहराची धार्मिक व सांस्कृतिक परंपराही जपली जात होती.



मात्र, सन २००८ पासून पोलीस प्रशासनाने विसर्जनाच्या वेळेबाबत निर्बंध लागू केल्यानंतर अनेक मंडळांना पारंपरिक मार्गाने मिरवणूक पूर्ण करणे शक्य झाले नाही. त्यानंतर हा मार्ग बंद करण्यात आला असून आजतागायत तो पूर्ववत करण्यात आलेला नसल्याचे निवेदनात म्हटले आहे. सध्या शहरातील सुमारे ३५ ते ४० सार्वजनिक गणेश मंडळे विसर्जन मिरवणुकीत सहभागी होतात. मात्र, सध्या वापरला जाणारा पर्यायी मार्ग अरुंद गल्ल्या आणि बोळातून जात असल्याने मोठ्या प्रमाणात गर्दी, वाहतूक कोंडी आणि भाविकांची गैरसोय होत असल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे.

धार्मिक परंपरा जपण्याबरोबरच विसर्जन मिरवणुकीचे सुयोग्य नियोजन आणि भाविकांची सुरक्षितता लक्षात घेऊन पूर्वीचा पारंपरिक मार्ग पुन्हा सुरू करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

या निवेदनाच्या प्रती पालकमंत्री, खासदार, जिल्हाधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी तसेच संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांनाही पाठविण्यात आल्या आहेत.

आगामी गणेशोत्सवापूर्वी या मागणीवर सकारात्मक निर्णय घेण्यात यावा, अशी अपेक्षा सार्वजनिक गणेश मंडळांचे पदाधिकारी आणि शांतता समितीच्या सदस्यांनी व्यक्त केली आहे.

# आषाढी एकादशीनिमित्त दिग्रसच्या विठ्ठल मंदिरात भक्तांची मंदियाळी

प्रतिनिधी २६ जुलै

**दिग्रस** : आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त दिग्रस येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात शुक्रवारी पहाटेपासूनच भाविकांची मोठी गर्दी झाली. "विठ्ठल... विठ्ठल... जय हरी विठ्ठल"च्या अखंड नामघोषाने मंदिर परिसर दुमदुमून गेला. हजारो भाविकांनी श्री विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन घेत पूजा-अर्चा केली.

एकादशीनिमित्त मंदिराची विविधरंगी फुलांनी आकर्षक सजावट करण्यात आली होती. सजलेल्या मंदिराचे दर्शन भाविकांसाठी विशेष आकर्षण ठरले. यावेळी श्री विठ्ठल-रुक्मिणीची विधिवत महापूजा, अभिषेक, आरती आणि अन्य धार्मिक विधी भक्तिभावाने पार पडले.



दिवसभर मंदिर परिसरात भजन, हरिपाठ, नामस्मरण आणि विठ्ठल भक्तिगीतांचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले. स्थानिक भजनी मंडळांनी सादर केलेल्या अभंग, गवळणी आणि भजनांनी उपस्थित भाविकांना भक्तिरसात तल्लीन केले. लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्व वयोगटातील भाविकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आषाढी एकादशीचा उत्सव साजरा केला.

दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची मंदिर समिती आणि स्वयंसेवकांनी शिस्तबद्ध व्यवस्था केली होती. दर्शनरांगा, स्वच्छता आणि नियोजनामुळे भाविकांनी समाधान व्यक्त केले.

आषाढी एकादशीनिमित्त दिग्रस शहरात दिवसभर भक्तिमय वातावरण अनुभवायला मिळाले. विठ्ठलनामाच्या अखंड गजराने आणि भक्तांच्या उत्साहपूर्ण सहभागाने संपूर्ण परिसर भक्तिरसाने भारावून गेला.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय द्वारा ॲड राजेश शहा बिल्डींग (लाला बिल्डींग समोर ) अवधूतवाडी यवतमाळ ता. जि. यवतमाळ येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क** – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/26/A3072, RRC Helpline No. 8484842135